शनिवार
२२ सप्टेंबर १९७९
७५ पैसे

साप्ताहिक
# माणूस



## मागील दाराने येऊ पाहणारी एकतंत्री राजवट!

या शिवाय....

- गुलाम–ए–इश्क....प्रतिभा रानडे
- आंतरराष्ट्रीय बालक वर्षानिमित्त पुण्याच्या इन्व्हेस्टमेंट इन मॅन ट्रस्टने केलेला एक यशस्वी उपक्रम

# सप्रेम नमस्कार...



◘ दि. ११-९-७८ च्या लोकसत्तेत अटल-बिहारी वाजपेयींच्या भोपाळ येथील पत्रकार परिषदेचे वृत्त आहे. त्यांत दुहेरी सदस्यत्वाचा जनता पक्षातला प्रश्न नाहीसा झाल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्याची कारणे पुढील-प्रमाणे असल्याचेही म्हटले आहे.

१. संघांत अहिंदुनांही प्रवेश.

२. हिंदुराष्ट्र ह्या शब्दाऐवजी भारतीय राष्ट्र असा प्रयोग.

३. संघ स्वयंसेवकांवर राजकीय पक्ष पदाधिकारी अथवा आमदार खासदार बनण्यावर संघाने घातलेली बंदी.

हे वृत्त व्यवस्थित नसेल तर त्याची जबाबदारी वृत्तपत्रावर येते. पण जर ही मुलाखत व्यवस्थित असेल तर ही अत्यंत लाजिरवाणी व दुःखद गोष्ट झाली असे नमूद करावेसे वाटते. कारण अटल विहारी वाजपेयींसारख्या नावाजलेल्या पुढाऱ्याने वरील मुलाखतीत स्वतःच्याच पायावर धोंडा पाडून शिवाय रा. स्व. संघाचेही अतोनात नुकसान केले आहे.

रा. स्व. संघ ही भरत खंडातील हिंदुधर्म संस्थांच्या धर्तीवर चालणारी संस्था आहे. ह्यात सभासदत्व किंवा सदस्यत्व नसते. संघस्थानावर व्यक्ती व समष्टीगुणवर्धक असे कार्यक्रम भगव्या ध्वजाला प्रणाम करून नित्यनियमाने चालतात, ह्या कार्यक्रमांत कोणाही व्यक्तीला भगव्या ध्वजास प्रणाम करून संघस्थानावर येता येते. तेव्हा संघात प्रवेश हा वाक्प्रचारच जर चूक आहे तर पुढील हिन्दू–अहिन्दू हाही वाद उभा रहात नाही. बरे अहिंदुबाबतही त्यांची जर भगव्या ध्वजाला–राष्ट्रीय संस्कृतीचे प्रतीक अशा अर्थाने प्रणाम करावयाची तयारी असेल तर प्रवेश आपोआपच येतो. तेव्हा पहिला मुद्दा मूळ सघ तत्त्वज्ञान व विचारांशी विसंगत आहे.

रा. स्व. संघाच्या स्वयंसेवकांची व संस्थापकांचीही अशी धारणा होती व त्या पायी अनेकांनी अनेक परींनी कष्टही भोगले. भावनेची एकात्मता व त्यातून साध्य होणारी प्रगती ह्यासाठी सांस्कृतिक एकात्मतेचा साक्षात्कार सर्वांना करायचा ही दृष्टी यामागे होती. ती सांस्कृतिक एकात्मता 'हिंदुराष्ट्र' ह्या शब्दांत प्रतीत होते. ही राजकीय कल्पना नाही. ही सामाजिक कल्पना आहे. ह्या 'हिंदू' शब्दासाठी संघात अनेक वादविवाद होत असतात. तेव्हा भारतीय राष्ट्र हेही संघाच्या मूळ ज्वलंत, प्रखर राष्ट्रवादी भूमिकेशी अनुसरून नाही.

जर संघ ही संस्था पाश्चात्त्य संस्था पद्धतीप्रमाणे सभासदांची किंवा सदस्यांची यादी ठेवत नाही तर एखाद्या देवळात जसे भाविक जाऊन येतात तसे सर्वच स्वयंसेवक संघांत येऊन जाऊन असतात. अशा स्वयंसेवकांचे संघाकडून कोणत्याही बाबतीत नियंत्रण हेच मुळात हास्यास्पद ठरते. स्वयंसेवक कुठेही, केव्हाही कार्यमग्न असतात. स्वयंसेवकत्व ही एक भावनिक बाब असताना अमुक एकजण राजकीय पक्षाचा पदाधिकारी आहे, अथवा आमदार–खासदार आहे म्हणून तो स्वयंसेवक नव्हे हे विचारांची दिवाळखोरी दाखवणारे आहे. असले हे फोल विचार राष्ट्रीय नेत्यांकडून व संघाच्या प्रवक्त्याकडून ऐकण्यासारखे दुर्भाग्यपूर्ण काय असेल ?

वाईट अशाचे वाटते, की संघ आपल्या मूळ विशिष्ट तत्त्वांपासूनच ढळत आहे हे एक. दुसरे असे की हे तत्त्वप्रणालीचे फेरविचार राजकीय क्षेत्रातील चार दोन पुढाऱ्यांच्या आरोपांसाठी ! ते पुढारीही असे की जे काही ना काही आरोप करण्यासाठी व वेगळी चूल मांडण्यासाठी टपलेलेच होते असे. बरे साधी गोष्ट अशी, की विचारप्रणालीचा फेरविचार जित पक्ष कधीच करीत नसतो तर हरलेला पक्ष करीत असतो. अशा परिस्थितीत इंदिरा काँग्रेसने कसलाही फेरविचार केलेला नाही व सघालाच चुकीच्या वेळी फेरविचार सुचतोय. बरे तोही कुणासाठी तर राजनारायण अथवा मधु लिमये अशांसारख्या बावदुकांसाठी. जो संघ आतून अनेकांनी

**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : सतरावा
२२ सप्टेंबर १९७९
किंमत : ७५ पैसे

संपादक
**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४ ५९

सुचविलेल्या अनेक कल्पनांवर साधा विचार अथवा प्रयोगही करायला राजी नसे तो अशा आचरटाचार्यांसाठी कसरती करतो हे पाहून परभ्राजिष्णपणाचेही दु:ख होते. ज्या मुसलमानांच्या संघ प्रवेशाविषयी १९४८ च्या संघर्षाच्या अत्यंत कठीण काळातही कुणाही संघ कार्यकर्त्याने किंवा स्वयंसेवकाने विचारही न करण्याचे ठरवले त्याच संघाला आज संस्थापकांना व पू. श्री. गुरुजींना खोटे पाडायचे आहे ?

ह्याच संदर्भात साप्ताहिक 'माणूस' मध्ये आलेल्या श्री. इनामदारांच्या 'अटलजींची भरारी व्यर्थ जाणार काय ?' ह्या प्रश्नाचाही परामर्श घ्यावासा वाटतो. संघ तत्त्वे मूळ सनातन धर्माप्रमाणे अपरिवर्तनीय व सकल हिंदुसमाजासाठी आहेत. संघ कार्याविषयी राजकीय क्षेत्रात जे पूर्वग्रह आहेत, ज्या चुकीच्या समजुती आहेत व जो अजाणता अथवा जाणूनबुजून चुकीचा प्रचार केला जातो, त्याला वेळोवेळी योग्य उत्तरे देण्यासाठी, त्या क्षेत्रात संगठन उभे करून, इतर अनेकांना अशा तऱ्हेनं देशसेवेची संधी प्राप्त करून द्यायची अशा उद्देशाने भारतीय जनसंघाची स्थापना झाली. त्यानुसार आतापर्यंत त्या पक्षाचे कार्यकर्ते लोक जागृती करीतही होते. पण आता इतक्या वर्षांनंतरही व आतातर हातीं बरीच सत्ता असूनही ह्या पुढाऱ्यांकडून वेळोवेळी संघावरील आरोपासंबंधांत समर्पक व नियमितपणे उत्तरे विरोधकांना दिली तर जात नाहीतच पण अटलजींसारख्या अखिल भारतीय पुढाऱ्याने संघावरच, तो स्वत:मध्ये परिवर्तन घडवून आणण्यास वेळ लावीत आहे अशी टीका करावी ह्याचे आश्चर्य वाटते. अशा वेळ लागण्यामुळे अटलजींची भरारी (!) व्यर्थ जाणार काय ? हे विचारणेही तर्कशुद्ध वाटत नाही. १९७७ मध्ये काय अटलजींनी भरारी मारली ? ७७ ची चळवळ जयप्रकाशांची व रा. स्व. संघाची. त्यात जनसंघाच्या नेत्यांचे योगदान किती ? उलट संघ स्वयंसेवकांच्या जोरावर जनसंघीयांचा फायदा झाला व आता पुन्हा त्यांच्या सोयीसाठी पुन्हा बदलावे तेही संघाने व तेही विनाविलंब ! म्हणजे असे की आपली पदरमोड करून आईने मुलाचा चरितार्थ चालवायचा तरी मुलाने म्हणायचे ती काम हळू करते.

**शशिकांत वि. जोशी**

११ सप्टेंबर तारापूर

( आणखी पत्रव्यवहार मलपृष्ठ २ वर )

# युद्धाच्या लांबसर सावल्या

And we are here as on a
darkling plain
Swept with confused alarms of
struggle and flight
Where ignorant armies
clash by night
—Matthew Arnold

युद्धाच्या लांबसर सावल्यांचे कफन
या खंडप्राय देशावर पसरताना
आम्ही हतबुद्ध पहातोय
आणि आमच्या हातात आहेत दुर्मिळ
होत चाललेल्या
कागदांचे कपटे.
या कागदांवर उमटणारी सगळीच नावं
दूरची–आमचे कोण ?

दिवसेंदिवस सावल्यांचे थर
चढत जातील एकमेकांवर
आणि मग आम्हाला मोफत मिळणारा
जीवनवायू पातळ होत जाईल.
मग आमच्या नाकपुड्यांनी
कोणत्या दिशेला पहायचे ?

या सावल्यांचे महाकाय ऑक्टोपस
पसरतील सहस्र हात
आणि घेतील घास
नकाशाबाहेर फाटणाऱ्या कुबट शहरांचा
आणि निर्मनुष्य गावांकडचा.
( डोंगर कपारीतल्या रानफुलांना वाटेल
आला असेल एखादा अवेळी आषाढ ! )
निनावीपणाची सर्वदूर वाळवंटे
होतील नामशेष या सावल्यांच्या खेळात.

...चुकून कुठूनतरी दक्षिण आफ्रिकेतून
पावशांचे थवे मायग्रेट होतील...
मग मॅनेजरचे डिक्टेशन कोण घेणार ?
लंच-अवरला डबे कोण खाणार ?
आणि टी. व्ही. वरचे हिन्दी सिनेमे
कोण पहाणार ?
च्यायला खरंच कोण बरं ?

हे भारतीय माणसा,
तुला या दिवाळीचं ग्रीटिंग
काय देऊ ?
तैलरंगातलं औषधापुरतं तुपाचं
चित्र हवंय ?
पण तेही पोस्टमनच्या श्वासाने
विरघळून जाईल.
मग दोषी कुणाला धरायचे ?

या अखंड देशाच्या सुटत चाललेल्या भिंतींवर
हिडीस रंगकामाची सालाबाद कंत्राटे
कधीच लंपास झालीयत..
आमच्या बापजाद्यांच्या भिंतींवर
त्यांचे राकट हात आम्ही कुठवर रोखणार ?

या देशातल्या माणसाच्या
जीवनात एक डिसेंबर येतोय...
पण ज्याने वसंत कधी पाहिलाच नाही
त्याला डिसेंबरचं काय !
खंत एवढीच, त्याचं गोठलेलं दु:ख
प्रवाही करणारा
एखादा कोमट प्रवाह या हिन्दीमहासागराच्या
सखोलतेत
नाहीच का ?
की आपल्या देशाचाच अखंड
आइसबर्ग होतोय ?

मुलांनो हे तुमचं वर्ष आहे,
पण खुर्च्यांवरच्या तुमच्या छोट्या दोस्तांनी
तुमच्या तोंडाला ऑलिव्हची पानं पुसलीयत,
तुमची उद्याची इतिहासाची पुस्तकं
सध्या कुरुक्षेत्रावरच्या अर्जुनासारखी
मतिहीन खांब झालीयत;
आणि गणिताच्या सगळ्या पायऱ्या
चुकल्या तरी
सगळेच परीक्षक
उत्तराचा दावा करीत आहेत
( दरम्यान नागरिकशास्त्राच्या पुस्तकांची
छपाई थांबवण्यात आल्याची आवई आहे. )

तेव्हा सांगत काय होतो
की या सावल्यांच्या 'डोळा-बोट' अंधारात
आणि काळाबाजाराच्या चढत्या भावात
तुमच्या आमच्या इत:पर दिवसांचं अवमूल्यन
केव्हांचंच होऊन बसलंय...
या खाईत तुमचे सगळे उद्या-परवा ढकलले
जात आहेत
तुमच्या हातात आहे तो फक्त एक
असहाय आज
आणि त्यावर काजळी धरणाऱ्या
युद्धाच्या लांबसर सावल्या

**–मुकुन्द सोमणी, संगमनेर**

# राष्ट्रपती व चरण-चव्हाण यांचे भावी कारस्थान

श्री. ग. मा.

गुप्ता आयोगामुळे इंदिरा-संजय यांचे राजकीय भवितव्य पुन्हा थोडे काळवंडल्यासारखे झाले आहे, हे खरे आहे. एकीकडे इंदिरा काँग्रेसमध्ये भरती होण्यासाठी पुढाऱ्यांचे, अनुयायांचे लोंढे निघालेले आहेत, सगळ्या ठिकाणचे पक्षी चरण्यासाठी या झाडावर गोळा होत आहेत, मोठमोठे 'व्रात्यस्तोम विधी' मुंबईसारख्या महानगरीत साजरे होत आहेत आणि दुसरीकडे आणीबाणीतील पापे त्यांना तुरुंगाच्या, राजकीय वनवासाच्या टोकाकडे वेगाने ढकलत नेत आहेत. एखादा राजकीय नेता लोकप्रिय असतानाही त्याला निकालात काढण्यासाठी जी क्रौर्यबुद्धी अंगी मुरलेली असावी लागते ती मुळातच आपल्या समाजात नाही. मग ती राजकीय नेत्यात तरी कुठून येणार ? पाकिस्तानात हे घडू शकते. आपल्याकडे हे अद्याप तरी घडलेले नाही. अगदी ब्रिटिशांनीही आपल्या राष्ट्रीय नेत्यांना फार क्रूरपणे वागवलेले नव्हते. तसे असते तर येथे टिळक-गांधी अयशस्वी ठरले असते. दुसऱ्याच प्रकारचे नेतृत्व येथे उदयास आले असते व मान्यताही पावले असते. ब्रिटिशांनीही जो क्रूरपणा आपल्या राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या बाबतीत, म्हणजेच त्यांच्या राजकीय शत्रूंच्या बाबतीत दाखविला नाही, तो आपले आजचे गलितगात्र नेते इंदिरा गांधींच्या बाबतीत दाखवू शकतील, ही शक्यता फार कमी आहे. इंदिरा गांधी आपण निर्दोष आहोत, आणीबाणीत फारसे गुन्हे-अत्याचार घडलेले नाहीत असे कितीही म्हणोत आणि त्या तसे म्हणत राहणारही; पण शहा आयोग, गुप्ता आयोग यांनी त्यांचे म्हणणे पुराव्यानिशी खोटे ठरवलेले आहे. प्रश्न आहे तो हा की, अशा गुन्ह्यांना शासन कसे आणि किती करायचे ? हे ठरवताना इंदिरा गांधींचे जनमानसातील स्थान गृहीत धरायचे की नाही ? याबद्दलचे पूर्वसंकेत आपल्याकडे उपलब्ध नाहीत. नवे संकेत धडाडीने रूढ करण्यासाठी हवी असलेली राजकीय हिंमत प्रचलित नेतृत्वा-जवळ औषधालाही नाही. जयप्रकाशांची लोकप्रियता, त्यांचे जन-मानसातील स्थान ध्यानात न घेता इंदिरा गांधींनी बेदरकारपणे त्यांना तुरुंगात घातले. सगळा रा. स्व. संघ गजाआड ढकलून त्या मोकळ्या झाल्या. असा बेगुमानपणा आज इतर कुणाजवळच नाही. त्यामुळे त्यांना कठोर शिक्षा आजवर होऊ शकलेली नाही. लोकसभेत भरपूर संख्याबळ असताना, उत्तरेकडील सर्व राज्ये ताब्यात असताना मजबूत अशा जनता सरकारला जी हिंमत दाखवता आली नाही, ती सध्याच्या औटघटकेच्या काळजीवाहू चरण-चव्हाण सरकारला दाखवता येईल, देशात इंदिरा-लाट फैलावत असताना लोक या स्वत्त्वहीन चरण-चव्हाण सरकारचा कठोर शिक्षेचा निर्णय निमूटपणे स्वीकारतील, हीही शक्यता फारच कमी आहे. 'इंदिराजींना निवडणुकीत भाग घ्यायला बंदी करावी' अशी सूचना पुढे आल्यावर स्टीफन लगेच गरजले : 'वेळ आलीच तर तुरुंग फोडून आम्ही इंदिरा गांधींना राष्ट्रपती भवनात पंतप्रधानपदाच्या शपथविधीसाठी मिरवणुकीने घेऊन जाऊ.' कितीही पोकळ मानली तरी ही धमकी सध्याच्या मरतुकड्या सरकारच्या अंगात कापरे भरवायला पुरेशी आहे. त्यातून पै आणि सुब्रह्मण्यम ही दोन गुप्ता आयोगाने इंदिरा-संजयप्रमाणेच मारुती-प्रकरणी गुन्हेगार ठरवलेली माणसे या चरण-चव्हाण सरकारात जागा अडवून बसलेली आहेत. संजय-इंदिरा यांना हात लावायचा तर या दोघांना प्रथम मंत्रिमंडळातून बाहेर हाकलायला पाहिजे. अशी हाकलाहाकली करायला थोडे तरी आप-कमाईचे बळ अंगी असावे लागते. ते आज नाही चरणसिंहांजवळ, चव्हाणांचे तर नावच नको. म्हातारी काँग्रेस जगवण्यासाठी मिळतील त्या कुबड्या जमवण्यात त्यांचा सगळा जीव आणि वेळ खर्च होत आहे. कोण पै-सुब्रह्मण्यम यांना अशा नाजुक वेळी हाकलून, आहेत त्यातल्याच दोन कुबड्या गमावणार ? आणि हे शक्य होत नाही तोवर इंदिरा-संजय यांनाही मारुती-प्रकरणी धक्का लावणे शक्य होणार नाही. शिवाय लोकमानसावर या अहवालांचा काडीचाही परिणाम होत नाही, झालाच तर उलटा होतो, हेही आजवरच्या अनुभवाने सिद्ध होऊन चुकलेले आहे. ज्या आयोगांच्या शिफारशी अंमलात आणल्या जाणार नाहीत, आयोगांनी ठपका ठेवला तरी गुन्हेगारांना कसलेही शासन होणार नाही, अशा आयोगांचा उपयोग काय, कशासाठी जनतेचे लक्षावधी रुपये यासाठी पाण्यात घाला-यचे, असे प्रश्न सर्वसामान्य माणसे विचारू लागलेली आहेत. बरें, आयोगांचे निर्णय तरी निःपक्षपातीपणे, राजकीय पक्षांची सोय-गैरसोय न पाहता ठरलेल्या वेळी प्रसिद्ध केले जातात का ? निवडणुका जाहीर झाल्यावरच चरणसिंगांनी हा गुप्ता आयोग प्रसिद्ध का करावा ? चरणसिंग-चव्हाण यांच्याजवळ तर या प्रश्नाचे उत्तर नाहीच; पण जनता-नेते चंद्रशेखरही या राजकीय हेतूच्या आक्षेपातून सुटू शकत नाहीत. जनता पक्ष सत्तेवर असताना हा अहवाल क्रमशः प्रसिद्ध करण्याची आता-सारखी धमकी त्यांनी का दिली नाही ? तेव्हा हे सगळे इंदिरा गांधींना नामोहरम करण्याचे राजकारणी कारस्थान आहे, न्यायाची किंवा लोकशाही मूल्यांची चाड म्हणून प्रथमपासूनच हे आणीबाणी अत्याचारप्रकरण हाताळले गेलेले नाही, अशी लोकांची समजूत झाल्यास ती चुकीची म्हणता येत नाही. एकीकडे सरकार पाडायला किंवा वाचवायला इंदिरा गांधींची मदत घ्यायची आणि दुसरीकडे

पृष्ठ २२ वर

पुणे वार्ता

# पुन्हा एकदा विद्यापीठ बंद

दि. १० सप्टेंबर. पुणे विद्यापीठ बंद. पुणे विद्यापीठातील वसतिगृहाच्या फी-वाढीच्या निषेधार्थ आणि स्थगित करण्याच्या मागणीसाठी वसतिगृहातल्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचं कामकाज बंद पाडलं. या वसतिगृहात ३०० विद्यार्थी आणि ६५ विद्यार्थिनी राहतात. त्यांची प्रत्येक सत्राची फी १५७ रुपयांवरून २१७ रुपये करण्यात आली आहे आणि फी वाढली तरी वसतिगृहातल्या असंख्य गैरसोयींमध्ये क्वचितच सुधारणा होतात.

विद्यार्थी विद्यार्थिनींनी दि. १० रोजी विद्यापीठाचं मुख्य प्रवेशद्वार अडवलं. बसेस परत पाठवल्या, प्राध्यापकांना विद्यार्थ्यांना परत पाठवलं आणि विद्यापीठाचं कामकाज बंद ठेवलं.

वसतिगृहातील मुलांची युनियन, पतित-पावन संघटना, अ. भा. विद्यार्थी परिषद आदी विद्यार्थी संघटनांचा या आंदोलनात सहभाग आणि पाठिंबा होता.

त्याच दिवशी विद्यापीठाच्या मुख्य कार्यालयाशी झालेल्या सभेला कुलगुरू डॉ. राम ताकवले उपस्थित राहिले. 'फी वाढ अन्याय्य असून रद्द करावी, वसतिगृहापेक्षा कार्यकारिणीच्या सभासदांच्या सोयीकडेच अधिक लक्ष दिले जाते, आताच फी-वाढ स्थगितीची घोषणा करा,' असा सूर विद्यार्थ्यांच्या भाषणांतून उमटला.

कुलगुरूंनी विद्यार्थ्यांना सांगितलं की, 'हा विषय मी कार्यकारिणीच्या सभेपुढे ठेवीन. फी वाढ स्थगितीचा अधिकार मला नाही कारण कार्यकारिणी आणि विद्वत सभेने तो घेतला आहे.'

तावडतोब विद्यार्थ्यांनी,प्रा. दाभोळकरांनी गेल्या वर्षी तात्पुरत्या स्थगितीचा आदेश दिल्याचं कुलगुरूंच्या निदर्शनास आणून दिलं; पण कुलगुरू म्हणाले की, हा विषय मला कार्यकारिणीसमोर ठेवावाच लागेल.

हा दिवस 'बंद'मध्येच पार पडला. विद्यापीठात शांतता नसली तरी विद्यार्थी घोळक्यानं बसून होते. दोन्ही कॅन्टिन्स बंद होती.

रात्री विद्यार्थ्यांची बैठक झाली. या वेळेपर्यंत बहुसंख्य विद्यार्थी दुसऱ्या दिवशी पुन्हा विद्यापीठ बंद न करता कार्यकारिणीच्या बैठकीपर्यंत थांबावं किंवा फार तर चक्री-उपोषण करावं या विचाराचे होते; पण रात्री विद्यार्थी जेवत असताना विद्यापीठ कार्यकारिणीचे एक सदस्य त्या ठिकाणी आले आणि त्यांनी विद्यार्थी नेत्यांना 'तुम्ही विद्यापीठ बंद केल्यास होस्टेलला मी कुलपं ठोकीन' असे म्हणाले. विद्यार्थी अधिक संतप्त झाले.

दि. ११ सप्टेंबर. सकाळच्या सभेत आजही विद्यापीठ बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. सकाळी ७ वाजता विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मुख्य प्रवेशद्वारापाशी बैठक मारली. बसेस, विद्यार्थी कर्मचारी दाराशीच अडकून पडले. विद्यार्थी नेत्यांनी कुलगुरूंशी संपर्क साधून या प्रश्नासाठी चोवीस तासात कार्यकारिणीची बैठक बोलावण्याची विनंती केली, 'पण मी कोणत्याही दबावाखाली निर्णय घेणार नाही' असं सांगून त्यांनी नकार दिला.

विद्यार्थ्यांनी मग समोरच्या पोलिसांकडून स्वतःला अटक करवून घेतली. यामध्ये एकूण २३८ विद्यार्थ्यांना अटक करण्यात आलं. त्यात ६१ विद्यार्थिनी होत्या. विद्यापीठाचं कामकाज अंशतः चालू राहिलं; पण सर्वत्र शांतता. विद्यार्थी नाहीत म्हणून काही तासच झाले नाहीत. हे सगळे विद्यार्थी संध्याकाळी वैयक्तिक जातमुचलक्यावर सुटले. या धरपकडीबाबत विद्यापीठाचे विकास अधिकारी श्री. थोरात यांनी पोलिसांकडे तक्रार केली की, हे विद्यार्थी माझ्या दारासमोर आरडाओरडा करतात, मला त्याचा त्रास होतो. (हे गृहस्थ प्रवेशद्वारापाशीच राहतात.) माझा एल. एल. एम.चा अभ्यास आणि माझ्या मुलांच्या चाचणी परीक्षा असल्याने या आवाजाचा आम्हाला भलताच त्रास होतो. श्री. थोरातांनी पोलिसात तक्रार नोंदविण्याचा परिणाम म्हणून की काय विद्यार्थ्यांना अटक केली असं काही विद्यार्थ्यांचं म्हणणं आहे.

या धरपकडीच्या वेळी त्या ठिकाणी चार वसतिगृहाच्या रेक्टर्सपैकी फक्त एकजण उपस्थित होते!

याच दिवशी कुलगुरूंनी सर्व प्राध्यापकांची सभा घेतली. त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या बाजूने अनेक प्राध्यापकांनी भाषणं ठोकली.

पुन्हा विद्यापीठाच काम सुरळीत चालू झालं. दि. २२ च्या कार्यकारिणीपर्यंत सर्वच विद्यार्थ्यांनी शांततेचं धोरण स्वीकारायचं ठरवलं.

हे आंदोलन अशा प्रकारे दोन दिवसातच संपुष्टात आलं. यामागील विद्यार्थ्यांची आणि विद्यापीठाची भूमिका या दोघांनीही विचारात घेतल्याचं दिसत नाही.

विद्यार्थी ज्या वसतिगृहात रहातात, त्याची हालत विद्यापीठातील स्थावर व्यवस्थापकांनी जरूर पहावी. तिथं पाण्याची मुबलकता असली तरी केव्हाही, कोणत्याही क्षणी हे पाणी जाऊ शकतं. अंघोळ करत असताना अचानक पाणी जाणं, यातील अडचण विद्यार्थीच सहन करू जाणे! गरम पाणी ही तर या विद्यार्थ्यांना पर्वणी असते. विजेचे पैसे मात्र हटकून घेतले जातात. विद्यार्थी म्हणतात आम्ही पैसे भरतो आणि पदरात अन्न आणि निवाऱ्याची साधी सोयही पडत नाही, मग पैसे कशासाठी द्यायचे. विद्यार्थ्यांचंही चूक नाही. फी वाढवणं जेवढं सोपं तेवढंच तिथल्या गैरसोईचं निराकरण करणं अवघड. विद्यापीठातील अधिकारी इकडं कधी लक्ष देतच नाहीत. जणू आणखी काय सुधारणा करायच्या? असा प्रश्न यांच्यासमोर उभा ठाकलेला असतो.

आजच्या काळात फीवाढ एक वेळ मान्य करता येणे शक्य आहे; पण त्यासाठी विद्यापीठानं काही सुधारणा घडवून आणणे अत्यावश्यक आहे. विद्यार्थ्यांना कोणत्या मुद्द्यावर समजवायचं हे त्यांना अजूनही समजत नाही. इतर बाबींवर एवढाले खर्च

अकारण आणि विनाकारण केले जातात; पण या सुधारणांसाठी मात्र विद्यापीठाकडे कधीच पैसे नसतात. बरं, विद्यार्थ्यांकडून पैसे घेऊन त्याचा विनियोग दुसऱ्या ठिकाणी केला जातो हे विद्यार्थी कसं सहन करतील ?

पण तरीही या आंदोलनात एक गोष्ट प्रकर्षानं जाणवली की, विद्यार्थ्यांनी आपल्या मागण्या अशा प्रकारे सोडवता कामा नयेत, निदान त्यासाठी जे कारण पुढं केलं गेलं ते तरी न्याय्य होतं का, याचा विचार करायला हवा होता. फी वाढ रद्द करा यापेक्षा वसतिगृहात आधी सुधारणा घडवून आणण्यासाठी, काही न्याय्य मार्गांचा अवलंब करायला पाहिजे होतं. थोडक्यात या आंदोलनाचा भर दुसऱ्या विषयावर पडला. 'आधी सुधारणा; मग फी वाढ' याऐवजी फी वाढ रद्द करण्याची मागणी विद्यार्थ्यांनी केली. साहजिकच इतर ठिकाणी एवढा वायफळ खर्च करणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा दहा रुपयांपेक्षा कमी वाढ का सहन करता येऊ नये, असा प्रश्न पडतो.

या आंदोलनात हेच चुकलं, विद्यार्थ्यांची मागणी चुकली, त्यामुळे आंदोलन दोन दिवसात थांबलं. आता विद्यार्थी गप्प आहेत, पण आपल्या या अडचणीचे निराकरण विद्यार्थ्यांनी लढा देऊनच केलं पाहिजे, त्यासाठी त्यांना पुन्हा एकदा वेगळं आंदोलन उभं करावं लागलं, तरी ते त्यांच्या न्याय्य मागण्यासाठी असेल ! ◘

## हिंदी दिन

१४ सप्टेंबर हा हिंदी दिन म्हणून साजरा केला जातो. पुण्यात या दिवशी प्रख्यात कवी डॉ. हरिवंशराय बच्चन यांच्या उपस्थितीत हिंदी दिनाचा कार्यक्रम पार पडला. 'हिंदी निकेतन' या संस्थेच्या रौप्यमहोत्सव प्रसंगी हिंदी-मराठी गीत संध्या आयोजित करण्यात आली होती. डॉ, बच्चन यांच्या 'मधुशाला' या काव्यसंग्रहातील काही रुबायांचे श्री. चोक्से यांनी केलेल्या मराठी रुपांतराचे गायन या प्रसंगी झाले.

हिंदी ही 'राज' भाषा आहे. देशातील बहुसंख्य लोक हिंदी बोलतात. हिंदी चित्रपट देशभर पाहिले जातात. या व अशा प्रकारच्या संपर्क माध्यमांद्वारे हिंदी आता जनसामान्यांची भाषा झालेली आहे. मोडक्या तोडक्या हिंदीत तुम्ही कुठेही बोललात तरी तुम्हाला काय म्हणायचंय हे समोरच्याला कळेल.

डॉ. बच्चन आपल्या भाषणात म्हणाले, 'भारतासारख्या खंडप्राय देशात जिथं अनेक भाषा, रीती, एकत्र नांदत आहेत, तिथं संपर्क भाषेची गरज असते. आपली संस्कृती या सर्वांना एकत्र आणणारी दुवा आहे. हिंदी ही संपर्क भाषा म्हणून सर्वांनीच आपलेपणाने स्वीकारायला हवी. हिंदीला कुणाच्याही प्रगतीमध्ये अडथळा आणून वर येण्याची इच्छा नाही, पण आजच्या दिवशी हिंदी ही आपली सर्वांची भाषा म्हणून स्वीकारावी असं आवाहन मी करेन !' डॉ. बच्चन यांनी 'मधुशाले' तील काही रुबाया आणि एक कविताही आपल्या खास ढंगात सादर केली. पूर्वी कवितांच्या मेळाव्यात गाजणारे बच्चन त्या दिवशी 'खंडहर बता रही हैं कि इमारत कितनी बुलंद थीं' या वाक्याची आठवण करून देत होते.

या प्रसंगी अध्यक्ष म्हणून फिल्म इन्स्टिट्यूटचे संचालक श्री. एन. व्ही. के. मूर्ती उपस्थित होते. आणि प्रमुख पाहुण्या म्हणुन सौ. जया अमिताभ बच्चन उपस्थित होत्या. (अर्थात प्रेक्षक गणापैकी बहुतेकजण जयाला पाहण्यासाठीच गर्दी करून होते !) पण डॉ. बच्चन यांनी काव्यरसिकांना मात्र खूष केलं. हिंदी दिन यापेक्षा आणखी कशा प्रकारे कारणी लागायचा ! ◘

## कुणासाठी ! कशासाठी !

रविवारचा दिवस. सकाळची वेळ, सारसबागेसमोरचा रस्ता सुटाबुटातली सेंट चोपडलेली अनेक माणसं जमा झालेली. सहज डोकावलं. तीन चाकी सायकली ओळीनं उभ्या. मऊ गुबगुबीत गाद्या असलेल्या त्यावर तेवढीच गोजिरवाणी बालकं बसलेली त्यांच्यात आता स्पर्धा चालू होणार होती. त्यांचे पालक चिअरिंग साठी जमा झालेले. आजूबाजूला नजर फिरली. प्रेक्षकांत शर्टला भोकं पडलेली, नाकात शेंबूड असणारी, चड्डीला गुंड्या नसलेली बालकं उभी होती. बालक वर्षाचा हा कार्यक्रम. बालकांच्या 'उद्धारा'साठी त्या बालकांना तीन चाकी सायकलवर कधी बसायला मिळणार असा प्रश्न कुणालाच पडला नाही. कसा काय पडणार ? मऊ फोमच्या गादीवर पंख्याखाली बसून बालकांच्या उद्धाराच्या 'गप्पा' मारणाऱ्या धनिकांचे हे खेळ. या बालकांच्या प्रश्नाला त्यात कितीसं स्थान असणार ?

काही मुलं सुवर्ण कांतीची. खूप मुलं फाटक्या चड्डीतली आईबापाजवळ दोन वेळच्या जेवणाची मागणी करणारी. इथं काही मुलांसमोर काजू, बेदाणे, मनुकांचा ढीग. खूप मुलांना याला काय म्हणतात ते माहित नाहीये. काजू कसा असतो हे माहीत नाही. त्यांना कुणी क...क...काजूचा असं शिकवलं नाही.

नुकताच जेसीसी सप्ताह पार पडला. एका जेसीज क्लबतर्फे ही तीन-चाकी स्पर्धा आयोजिलेली. कुणासाठी ? हा प्रश्न इथं नसतो. क्लब मेंबर्सच्या बालकांच्या मनोरंजनासाठी ? छे ! त्यांच्या पालकांच्या मनोरंजनासाठी. वृत्तपत्रांतून या कार्यक्रमांचं सचित्र वर्णन आलं यातच त्यांना समाधान.

बालक वर्ष सुरू होऊन आठ महिने लोटून गेले. अजूनही तीन चाकी सायकल स्पर्धा भरवून बालक वर्ष साजरं केल्याचं समाधान मिळविणाऱ्यांना आता काय म्हणावं ! जवळचा पैसा संपवायचा कसा ? हा प्रश्न त्यांना सतत भेडसावत असतो. मग त्या पैशांना अशा वाटा फुटतात. जनकल्याणासाठी, जनसामान्यांच्या उद्धारासाठी हा पैसा कारणी लागतो ! दोन परिसंवाद एक चिकित्सा शिबिर, परदेशी खेळांच्या स्पर्धा आदी कार्यक्रमांनी हा जेसीसी सप्ताह पार पडला. पण 'कार टू कार्पेट' जगणाऱ्यांना अजूनही प्रश्नच सापडत नाहीत ही गोष्ट निश्चित दुःखदायी आहे.

–प्रतिनिधी

आंतर राष्ट्रीय बालक वर्ष आणि इन्व्हेस्टमेंट इन मॅन ट्रस्ट

## ग्रामीण भागात बालवाड्यांची संख्या कशी वाढू शकेल ?

# एक विधायक व यशस्वी उपक्रम

कोणतंही नवं काम सुरू करण्यापूर्वी थोडी पूर्वतयारीची गरज असते; पण आपल्याकडे नवं काम सुरू करण्याचा उत्साह इतका असतो की त्या नादात पूर्वतयारीकडे कोणी लक्षही देत नाही. 'इन्व्हेस्टमेंट इन मॅन' हा पुण्याचा ट्रस्ट याला अपवाद आहे. आंतरराष्ट्रीय बालकवर्षानिमित्त ग्रामीण भागातही बालवाड्या सुरू व्हायला हव्यात असं ट्रस्टच्या कार्यकर्त्यांच्या लक्षात आलं आणि त्याचबरोबर बालवाड्या सुरू करण्यापूर्वी त्या 'चालवणाऱ्या शिक्षिकांनाच खास प्रशिक्षण दिलं जाणं आवश्यक आहे हेही त्यांनी ओळखलं. याच दृष्टिकोनातून ट्रस्टतर्फे शिरूरला बालवाडी-शिक्षिकांसाठी एक प्रशिक्षण वर्ग चालवला जात होता. श्री. अच्युतराव आपटे, निर्मलाताई पुरंदरे, आशाताई शेठ हे ट्रस्टचे प्रमुख कार्यकर्ते गेले जवळजवळ सहा महिने हा प्रशिक्षण वर्ग यशस्वी करण्यासाठी खपत होते आणि दि. १ सप्टेंबर रोजी या पहिल्या वर्गाचा समारोपही शिरूर येथे पार पडला.

बालवाडी प्रशिक्षण वर्गाची ही कल्पना अतिशय चांगली होती, उपयुक्त होती. इमारत जेवढी उंच बांधायची असेल तेवढाच पाया खोल असावा लागतो, याची जाणीव असणाऱ्या निर्मलाताईंची म्हणूनच या संदर्भात खास भेट घेतली. निर्मलाताईंशी बोलताना हे नेहमीच जाणवत आलेलं आहे की, विविध योजना त्यांच्या डोक्यात सतत गर्दी करून असतात आणि कोणी भेटलं, की या कल्पना लाह्यांसारख्या फुटू लागतात. मग निर्मलाताईंना कशाचंही भान राहात नाही. त्यांच्या योजना त्यांच्या मनात साकार होत असतात आणि तशाच ऐकणाऱ्याच्याही मनात त्यांनी आकार धरावा म्हणून निर्मलाताई धडपडत असतात. 'आपल्याला ग्रामीण जनतेचा उद्धार केला पाहिजे' अशा आशयाचं एकही वाक्य न बोलता निर्मलाताई गावात बदल घडवू शकणारे विविध उपक्रम चालवीत असतात आणि मला वाटतं, यातच त्यांच्या कामाच्या यशाचं रहस्य दडलेलं आहे.

या बालवाड्या प्रशिक्षण वर्गाबद्दल निर्मलाताई मला एकदा सांगत होत्या.

आपल्याकडे ग्रामीण भागात प्रशिक्षित शिक्षिका नाहीत म्हणून त्या ठिकाणी चांगल्या बालवाड्या निर्माण होत नाहीत, म्हणून बालवाड्या चालत नाहीत-शहरातील कुणी प्रशिक्षित व्यक्तीने अनोळखी गावात जाऊन बालवाडी चालवणं शक्य नसतं, कारण वातावरणाचा फार फरक पडतो. शहरात जन्म घालविलेल्याला खेडेगावात जाऊन त्यांच्यासारखं रहाणं जड जाईल, शिवाय ते परवडणारही नाही; पण मग डोळ्यांसमोर दिसणारं चित्र विदारक आहे. खेड्यातून ७ वी, ९ वी पास झालेल्या मुली घरात बसून असतात. घरची परिस्थिती, सामाजिक परिस्थिती, आर्थिक परिस्थिती यामुळे या मुलींना घरात बसावं लागतं. मग यांनाच प्रशिक्षण देऊन त्या गावात बालवाडी सुरू केली तर बरेच प्रश्न सुटू शकतील. या कल्पनेचा पाठपुरावा करताना मी हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेच्या प्राचार्या शांताबाई ब्रह्मे यांना भेटले. तिथं असा एक वर्षाचा अभ्यासक्रम शिकविला जातो.

'आम्ही सर्वांनी बसून हा सहा महिन्यांचा अभ्यासक्रम तयार केला. खेड्यांतील मुली वर्षभर शिकणे ही गोष्ट तितकीशी शक्य नसल्याने हा सहा महिन्यांचा अभ्यासक्रम शिरूर इथं सुरू केला. शिरूर आणि आजूबाजूच्या खेड्यांतील ४० मुलींचा या वर्गात समावेश होता. कै. ताराबाई मोडकांनी कोसबाडला आदिवासींसाठी अशा प्रकारचा अभ्यासवर्ग चालविला होता, त्याच तत्त्वावर आम्ही हा वर्ग सुरू केला. जबाबदारी मोठी होती; पण जिद्द जबरदस्त होती. त्यामुळे हा अभ्यासक्रम सहा महिने यशस्वीरीत्या चालविण्यात आम्हाला यश आले.

'शिरूरच्या नगरपालिकेनं वर्गासाठी हॉलची सोय विनामूल्य केली. पुण्यातील काही उत्तम शिक्षिका शिरूरला जाऊन शिकवीत असत. श्रीमती वसुंधरा शिवणेकरांचा तर तिथं मुक्कामच होता. या अभ्यासक्रमामागे ट्रस्टचा हेतू असा होता, की हे शिक्षण ग्रामीण भागात उपयोगी व्हावे. वर्गातील मुली जेव्हा पुढे बालवाड्या काढतील तेव्हा त्यांना देऊळ, चावडी, शाळा अशाच जागांचे सहाय्य घ्यावं लागणारय. तेव्हा ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या मुलींना आपल्याजवळील साधनांचा योग्य वापर कसा करता येईल याकडे सर्वांनी विशेष लक्ष दिले.

'या सहा महिन्यांच्या काळात या मुलींचा आत्मविश्वास वाढावा या दृष्टीने त्यांना पुण्याला आणून मूकबधीर विद्यालय, रिमांड-होम अशासारख्या संस्थांमध्ये नेले. आपल्या गावात एखादा विद्यार्थी असा असेल तर त्याला या संस्थांमध्ये पाठविता येईल हे त्यांना कळावं हा यामागचा उद्देश !'

आता पुण्यात दहा हजार बेकार असताना या मुलींना आणखी नव्याने प्रशिक्षित करायची काय गरज आहे असा प्रश्न शिक्षण-क्षेत्रातील लोकांना पडणे स्वाभाविक आहे. या संदर्भात निर्मलाताई म्हणाल्या, 'शहरातून उठून ग्रामीण भागात कुणी जाणार नाही. त्यांच्याकडून तशी अपेक्षा करणेही अवास्तव ठरेल. पण गावातून शिकलेल्या मुली घरात बसून असतात. त्यांनाच जर प्रशिक्षण दिलं तर तालुका पातळीवरून पुढील पिढी चांगली सशक्त करणे शक्य आहे. म्हणून गरज ओळखूनच आम्ही हा वर्ग सुरू केला. फक्त सुरुवात बालवाड्यांपासून करण्यापेक्षा मुळापासून म्हणजे शिक्षिका तयार करण्यापासून आम्ही केली'.

या मुलीला आर्थिकदृष्ट्या जर आपल्या पायावर उभं राहता आलं तर तिच्या विकासालाही ते पूरकच होईल. तिला ग्रामीण पार्श्वभूमी असल्यामुळे ती या बालवाड्या व्यवस्थित हाताळू शकेल. जर प्रत्येक गावा-

तून एक बालवाडी स्थापन केली तर त्या गावातील एका मुलीला प्रशिक्षित करायला हवे. त्याचसाठी या अभ्यासवर्गात विविध गावांतील मुली आल्या होत्या.

या अभ्यासक्रमामध्ये बालमानसशास्त्र, बालखेळ, बालगीते, बालवाडीचे व्यवस्थापन, जीवनव्यवहार, लघुउद्योग, सहकाराचे तत्त्व, सांस्कृतिक कला इत्यादी विषयांचा समावेश होता. त्यांचा उपयोग करून त्या प्रशिक्षित शिक्षिकेला बालवाडीबरोबरच लघु उद्योग, महिला मंडळ इत्यादी कार्यक्रम आखता येतील. यातून ती आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होईल आणि व्यक्तिविकासातही याचा तिला उपयोग होईल.

१ सप्टेंबरच्या कार्यक्रमात शिक्षणमंत्री सदानंद वर्दे जे म्हणाले ते अगदी खरंच. 'आज दिल्लीत काय घडतं, मुंबईत काय घडतं याचा विचार आमची वर्तमानपत्रं करतात. ( आमंत्रणे पाठवूनही पुण्यातील वृत्तपत्रांचा एखादा प्रतिनिधी तेथे हजर नव्हता. याला उद्देशून शिक्षणमंत्र्यांनी हा टोमणा मारला होता. ) ज्या गोष्टीचा जनसामान्यांच्या जीवनावर काहीही परिणाम होणार नाही अशा बातम्या वर्तमानपत्रांना छापायच्या असतात; पण ज्या कार्यक्रमातून समाजाचं पाऊल पुढं पडणार आहे त्या विधायक कार्याकडे कुणीच लक्ष देत नाही. आज मी इथं आलोय तो मंत्री म्हणून नव्हे तर प्राध्यापक म्हणून ! शिक्षणक्षेत्रात चाललेल्या या घटनेचं स्वागत करायला मी इथं आलोय ! बालवाड्यांचा आणि बालकांचा प्रश्न तालुका पातळीवरूनच सोडवावा लागेल !'

शिरूरचे नगराध्यक्ष श्री. रसिकलाल धाडीवाल या प्रसंगी बोलताना म्हणाले, 'अशा प्रकारचा कार्यक्रम आमच्या गावी होतो याचा आम्हाला अभिमान आहे. आमच्याकडून होईल ती सर्व मदत आम्ही करू ! '

कार्यक्रमाच्या सुरुवातीला बालवाडीतील काही मुलांचे कार्यक्रमही झाले.

या वर्गासाठी वीस हजार रुपये खर्च आला आणि असे आणखी वर्गही ट्रस्टच्या वतीने यापुढे सुरू करण्यात येणार आहेत.

या अभ्यासवर्गाचा गौरव शिक्षणाधिकारी मनोहर पंधे यांनीही केला. सरपंचांनी आपापल्या गावात बालवाड्या सुरू कराव्यात. त्यासाठी सरकारकडून शक्य तेवढी मदत केली जाईल असं आश्वासनही त्यांनी दिलं.

या बालवाडीद्वारा बालआरोग्याचे प्रश्न सोडविता येतील. सामाजिक चळवळीचा पाया तयार होण्याच्या दृष्टीने पालक जवळ येतील, त्यांचा उपयोग होऊ शकेल. त्या दृष्टीने पालकसभा, मेळावा, हळदीकुंकू असे कार्यक्रम आखून सर्वांना एकत्र आणणे शक्य होते.

मुलांवर चांगले संस्कार व्हावेत, त्यांना शिक्षणाची आवड लागावी हा बालवाड्यांमागील खरा उद्देश. त्यासाठी पालक, शिक्षकवर्ग यांचं डोळस सहकार्य हवंय.

आता या अभ्यासक्रमाचं लोण इतरत्रही पसरू पाहत आहे. अंबेजोगाई, ठाणे, अकोला, कऱ्हाड इथूनही पुढच्या प्रशिक्षणवर्गासाठी अर्ज आलेत. म्हणजे मुली तयार आहेत हे एक सुचिन्ह! शिरूरप्रमाणेच बारामती, हवेली या आसपासच्या तालुक्यांतूनही असे अभ्यासवर्ग चालविले जावेत अशी इच्छा तेथील मंडळींनी व्यक्त केली आहे.

यासाठी उत्तम शिक्षिका हव्यात. बी. ए., बी. एड. आणि त्याचबरोबर पूर्वप्राथमिक अध्यापनाचं १ वर्ष पूर्ण झालेल्या उत्तम शिक्षिकांची ट्रस्टला आज गरज आहे. त्यांना योग्य पैसे देऊन त्यांच्या सहकार्याने असे वर्ग चालविले जाऊ शकतील. अशा उत्साही तरुणींनी त्यासाठी ट्रस्टशी संपर्क साधावा असं आवाहनही निर्मलाताईंनी केलं.

या गरजेबरोबरच ट्रस्टपुढे दुसरी मोठी समस्या उभी आहे पैशाची ! या मुलींना शिक्षण दिल्यानंतर त्या गावात बालवाडी सुरू करणे आवश्यक आहे. अशा एका बालवाडीसाठी वर्षाला २५०० ते ३००० रुपये अंदाजे खर्च होतात. आपल्यातील काही धनिकांनी अशा बालवाड्यांना नियमितपणे पैसे पुरविले तर हा प्रश्नही पुष्कळसा सुटू शकेल. आपल्या या पैशांचा विनियोग व्यवस्थितरीत्या होईल याची हमी ट्रस्ट अर्थातच देईल; पण असं आर्थिक सहाय्य मिळाल्याशिवाय अशा समाजसेवी संस्था उभ्या राहू शकत नाहीत, असा अनुभव आहे.

पुणे विद्यापीठाच्या निरंतर शिक्षण योजनेच्या वतीने अभ्यासवर्गासाठी २००० रुपये व प्रत्येक प्रशिक्षणार्थींना एक सर्टिफिकेट देण्यात येणार आहे. शिरूर तालुक्यात ज्या बालवाड्या आता सुरू होतील, त्यातील तीन बालवाड्यांची जबाबदारी शिरूर नगरपालिका घेणार आहे, पुण्याचे के. ई. एम् हॉस्पिटल पाच बालवाड्या हाती घेणार आहे. इतरही संस्थांनी जबाबदारी उचलल्यास हे काम अधिक वेगाने पुढे जाईल. कारण ट्रस्टला श्रेय नकोय, काम व्हायला हवंय.

मागे १ मेला महाराष्ट्रदिनी या बालवाडी प्रशिक्षणवर्गाचं काम पाहायला गेलो होतो. प्रशिक्षणासाठी आलेल्या सर्व शिक्षिकांचा तो एक कौटुंबिक मेळावा होता. त्यांचे बालवाड्यांचे अनुभव त्या कथन करत होत्या. आता प्रशिक्षण घेऊन बाहेर पडताना त्यांचा आत्मविश्वास अधिकच वाढलेला दिसला.

प्रतिनिधी ' माणूस '

# जनता पक्ष

## वस्तुनिष्ठ मूल्यमापन हवे

वा. दा. रानडे

श्री. मोहन धारिया यांनी सध्याच्या पेचप्रसंगात आतापर्यंत भाषणे व मुलाखतीतून व्यक्त केलेले विचार लक्षात घेता त्यांचा जनता पक्षाचा राजिनामा अनपेक्षित नव्हता. घटकवाद आणि दुहेरी सभासदत्व या दोन प्रश्नांवर पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीने निश्चित भूमिका घेतली पाहिजे अशी मागणी त्यांनी कार्यकारिणीच्या गेल्या बैठकीच्या वेळी केली होती; पण कार्यकारिणीने हे प्रश्न अनिर्णितच ठेवले. दुहेरी सदस्यत्वाच्या प्रश्नावर निर्णय घेण्याचे अधिकार अध्यक्ष चंद्रशेखर यांना देण्यात आले. या प्रश्नाबाबत पक्षाची भूमिका स्पष्ट करणारे निवेदन मी लौकरच करीन; पण हे वाद आता थांबवा आणि निवडणुकींवर लक्ष केंद्रित करा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

घटकवाद आणि दुहेरी सभासदत्व हे धारियांनी उपस्थित केलेले प्रश्न महत्त्वाचे

आहेत असे त्यांना वाटते तर ते तातडीने सोडविण्याबाबत आग्रह धारियांनी सुरुवातीपासूनच का धरला नाही आणि पक्ष यापूर्वीच का सोडला नाही? घटकवादाबद्दल केवळ जनसंघाला दोष देता येणार नाही. इतर घटकांनी विशेषतः भालोदने कोठे घटकवाद सोडला? जनता पक्षात विलीन झालेल्या या घटकांनी आपापल्या पक्षाच्या स्वतंत्र अस्तित्वाचे औपचारिक विसर्जन केले खरे; पण प्रत्यक्षात वेगळा घटक म्हणूनच त्यांचे कार्यकर्ते काम करीत होते. जनता पक्ष एकसंध झालाच नाही!

याबाबतीत मूलभूत विचार असा करायला हवा की, असा पक्ष स्थापण्याची कल्पनाच मुळात चुकीची आणि प्रत्यक्षात येऊ न शकणारी अशी होती का? विरोधी पक्षांची नुसती आघाडी पुरेशी नाही त्यांचा एक पक्ष स्थापन झाला तरच काँग्रेसला तो प्रभावी पर्याय ठरू शकेल असा विचार जयप्रकाशनारायण यांनी मांडला होता. आणीबाणीच्या काळातच त्या दिशेने प्रयत्न झाले होते; पण त्यांना फारसे यश आले नव्हते. इंदिरा गांधींनी निवडणुकांची घोषणा करताच आता या बाबतीत विलंब नको, जनता पक्ष तातडीने स्थापन केला पाहिजे असा आग्रह जयप्रकाशांनी धरला आणि निवडणुकीच्या घोषणेनंतर दोनच दिवसांत जनता पक्षाची स्थापना झाली, असा पक्ष स्थापन करण्याबाबत आणीबाणीच्या काळात जे विचारमंथन झाले त्या वेळी यासंबंधी लिहिताना अशा पक्षाच्या यशाबद्दल मी काही शंका प्रदर्शित केल्या होत्या त्या खऱ्या ठरल्या आहेत. भिन्न धोरण विचारप्रणाली आणि कार्यक्रम असलेले पक्ष काँग्रेसविरुद्ध लढण्यासाठी एकत्र आले तरी शिस्तबद्ध पक्षाच्या उभारणीसाठी एक विचारप्रणाली, एक धोरण आणि एक कार्यक्रम हवा. भिन्न विचारप्रणालींची, धोरणांची, कार्यक्रमांची सांगड कशी घालणार? आपलीच भूमिका मान्य झाली पाहिजे असा आग्रह धरता सर्वांच्या विचारविनिमयाने शक्यतो एकमताने, नाही तर बहुमताने ठरेल ती भूमिका मान्य करण्याची आणि प्रामाणिकपणे आचरणात आणण्याची तयारी घटकपक्षांच्या नेत्यांनी आणि अनुयायांनी दर्शविली तरच असा पक्ष प्रभावीपणे कार्य करू शकेल हे उघड होते; पण तसे घडले नाही आणि अंतर्गत संघर्ष वाढत जाऊन त्याचे पर्यवसान अखेर जनता पक्ष फुटण्यात झाले.

जनता पक्षाच्या स्थापनेच्या वेळी त्यातून प्रभावी विरोधी पक्ष उभा रहावा एवढीच मर्यादित अपेक्षा होती. १९७७ च्या निवडणुकांत आपण सत्तेवर येऊ अशी या विरोधी नेत्यांना कल्पना नव्हती; पण जनतेने त्यांना बहुमताने विजयी करून सत्तेवर बसविले. पक्षाची एकजूट टिकवून आपला कार्यक्रम यशस्वीपणे अंमलात आणण्याचे आव्हान जनता पक्षाच्या नेत्यांना पेलले नाही. देशापुढील प्रश्न सोडविण्याकडे लक्ष केंद्रित करण्याऐवजी आपल्यातील संघर्ष मिटविण्यातच त्यांची शक्ती खर्च झाली.

जनता पक्षाचा प्रयोग फसला असे म्हणता येईल का? फूटपाडे बाहेर पडले, पक्षातील घाण गेली तो आता अधिक स्वच्छ व शुद्ध झाला आहे असे जनता पक्षाचे नेते म्हणत आहेत ते खरे आहे का? खासदारांच्या दृष्टीने विचार केला तर एकतृतीयांश पक्ष फुटला, दोनतृतीयांश राहिला. हा राहिलेला पक्ष अधिक एकसंधपणे काम करील आणि निवडणुकीत बहुमत मिळवून सरकार बनवील असा आशावाद त्याचे नेते व्यक्त करीत आहेत. नेत्यांनी असा आशावाद व्यक्त करावयाचा असतो; पण त्याला वास्तवाचा आधार किती? जनता पक्ष म्हणजे जनसंघाच्या प्रभावाखालचा पक्ष आहे अशी टीका इंदिरा गांधी तर १९७७ च्या निवडणुकीपासूनच करीत आल्या आहेत. त्यातला प्रचाराचा भाग सोडून दिला तरी त्यात मुळीच तथ्य नव्हते असेही म्हणता येणार नाही. जनता पक्षात जे घटक एकत्र आले त्यात समाजवादी पक्ष सोडला तर बाकी घटक उजव्या बाजूकडे अधिक झुकणारे होते. पक्षाच्या धोरणाला समाजवादी वळण देण्यात समाजवाद्यांना फारसे यश आले नाही. आपला पक्ष पुरोगामी धोरणाचा आहे अशी प्रतिमा जनमनात निर्माण करण्यासाठी काही पुरोगामी कार्यक्रमाचा समावेश पक्षाने आपल्या कार्यक्रमात केला; पण पुरोगामित्वाचा हा मुखवटा कार्यक्रमाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या वेळी गळून पडला. याचे ठळक उदाहरण जमीनसुधारणांच्या कार्यक्रमाचे. याबाबतीत पूर्वीच्या काँग्रेस राजवटीपुढे प्रगती जनता सरकारे करू शकली नाहीत. आणि त्याचे कारण उघड आहे. प्रश्न हितसंबंधांना दुखविण्याचा होता. भूमिहीनांना जमिनीचे वाटप करावयाचे तर बड्या शेतकऱ्यांना दुखवावे लागते, त्यांचा रोष ओढवून घेण्याची काँग्रेसप्रमाणेच जनता पक्षाच्या नेत्यांचीही तयारी नव्हती व नाही; पण या धोरणाने गरीब भूमिहीन शेतमजुरांचा व दलितांचा पाठिंबा जनता पक्ष कसा मिळविणार? जगजीवनरामांना पंतप्रधान करण्याचे आश्वासन देऊन सबंध हरिजनवर्गाचा पाठिंबा आपण मिळवू अशी जनता पक्षनेत्यांची कल्पना असेल तर ती चुकीची आहे. जनता राजवटीत व आपल्या परिस्थितीत काय फरक पडला हे पाहूनच हरिजनांनी त्या पक्षाबद्दलचे आपले धोरण ठरवावे हे अधिक स्वाभाविक आहे.

दुसरा प्रश्न दुहेरी सभासदत्वाचा. जनसंघाच्या सभासदांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आदेश मानावयाचे आणि जनता पक्षाचेही सभासद रहावयाचे अशी दुहेरी निष्ठा त्यांना ठेवता येणार नाही. याबाबत प्रथमपासूनच निर्णय घ्यावयास हवा होता. जनता पक्षाची धर्मनिरपेक्षतेची भूमिका जनसंघ सभासदांनीही मान्य केलेली आहे. ही मान्यता दिखाऊ आहे. त्यांनी हिंदुराष्ट्रवाद सोडलेला नाही या म्हणण्यात अर्थ नाही. त्यांच्याबरोबर कार्य करायचे तर त्यांच्यावर विश्वास ठेवायला हवा. जनसंघावर इतर घटकांचा खरा रोष निराळ्याच कारणासाठी आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा उपयोग करून घेऊन त्यांनी जनता पक्ष सभासद नोंदणी मोठ्या प्रमाणावर केली आणि पक्षांतर्गत निवडणुकांत पक्षाची सूत्रे त्यांच्याकडे जाणार असे दिसू लागले म्हणून निवडणुकीचाच डाव त्यांनी उधळून टाकला; पण आपली निष्क्रियता आपले संघटनदौर्बल्य झाकायाचा हा प्रयत्न होता हे वस्तुनिष्ठपणे मान्य करायला हवे.

अफगाणिस्थान....

लेखांक पाचवा

प्रतिभा रानडे

काबूल

# ‘तेव्हा असं वाटतं, आपल्या कथांची हस्तलिखितं घ्यावीत आणि सरळ हिंदुस्थानात पळून जावं!’

## गुलाम–ए–इश्क

लुई ब्यूनेल, कार्लोस सोरा, ट्रॉफॉ, गोडार्ड, अकिरा कुरोसावा, सत्यजित रे, इंगमार बर्गमन यांच्या नावांच्या मालिकेतच शफक तुरेलाय हे नाव कसं वाटतं? शब्दांच्या नादाच्या दृष्टीनं पाहिलं तर अगदी चपखल बसतं; पण संपूर्णपणे अनोळखी. तेव्हा त्यावर मत कसे काय द्यावे हा प्रश्न सगळयांनाच पडणार आणि ते खरंही आहे. कारण शफक तुरेलाय हा कदाचित सर्वांत नवीन चित्रपटदिग्दर्शक असावा. गेल्याच वर्षी त्याचा, ‘गुलाम–ए–इश्क’ हा त्याने दिग्दर्शित केलेला चित्रपट प्रकाशित झाला. अफगाणिस्थानातील राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थिती पाहिली, तो चित्रपट पाहिला की, असं वाटतं, शफक तुरेलाय हा दिग्दर्शक कोणता तरी वेगळा मार्ग चोखाळतो आहे.

सिनेमाधंद्यात असणाऱ्यांच्या मागं असणारं कोणतंही प्रसिद्धीचं झगझगीत वलय त्याच्याभोवती नाही. सर्वसाधारण माणसासारखा एका लहानशा अपार्टमेंटमध्ये तो रहातो, बसनं ऑफिसला जातो. काही तरी करून दाखवण्याची ऊर्मी असणाऱ्या माणसाप्रमाणं धडपड करतो.

शफक तुरेलाय याचे वडील कंदाहारचे प्रांताचे गव्हर्नर होते. इथला गव्हर्नर हा आपल्याकडच्या कलेक्टरसारखा असतो. खाऊनपिऊन सुखी. शफक लहान असताना राजकपूर, दिलीपकुमार, अशोककुमार यांचे सिनेमे इथे यायचे. त्यांच्या चित्रपटांच्या hostelgic आठवणी इथली मोठी माणसं मोठ्या कौतुकानं अजूनही सांगतात. तर कंदाहार गावाच्या धुळीत खेळणाऱ्या शफकने रजतपटावरची ती सुरेख झगमगती माणसं पाहिली आणि तो भारावूनच गेला. सिनेमाशिवाय इतर काही त्याला सुचेनाच. गव्हर्नरचा मुलगा, त्याला तिकिटासाठी कोण विचारणार? वेळ मिळाला की तो सिनेमा पहायचा. झाडाची काटकी हातात घेऊन तलवारीचे हात करीत, बरोबरीच्या मुलांना लढाईचे आव्हान देत गावातून हिंडायचा. पुढे त्याच्या वडिलांनी त्याला एक बॉक्स कॅमेरा आणून दिल्यावर शफकने धडाधड फोटो काढायला सुरुवात केली. एवढे फोटो काढले की, त्यांची संख्या बघूनच त्याच्या काकांनी त्याला ‘अफगाण फिल्म्स’ या सरकारी ऑफिसात नोकरी करणार का म्हणून विचारलं. शफकला तरी आणखी काय हवं होतं?

त्या गोष्टीला आता १५–१६ वर्षं झाली. त्या वेळी अफगाण फिल्म्सचं ऑफिस १०×१२ च्या एका खोलीत होतं आणि एक छोटासा मुव्ही कॅमेरा ही त्याची प्रॉपर्टी होती. अधूनमधून लहानमोठे अमेरिकन, ब्रिटिश डायरेक्टर्स, मध्यपूर्वेतील इस्लामी देशांवर सिनेमे काढत तेव्हा शूटिंगसाठी अफगाणिस्थानात यायचे, त्यांना मदतनीस लागायचे, तेव्हा त्यांच्याबरोबर काम करणं; क्वचित कधी शहाच्या इच्छेनं हजारबाराशे फुटांची छोटीशी फिल्म तयार करावी लागे, त्यासाठी मदतनीस म्हणून काम करणं, ऑफिसची झाडलोट करणं, कागद, फाइल्स व्यवस्थित लावून ठेवणं अशी सगळया तऱ्हेची कामं शफकला करावी लागायची; पण उत्साह एवढा दांडगा की, ऑफिसची वेळ संपली तरी हा आपला तिथंच काही तरी करीत बसायचा, उगाचंच घोटाळायचा. त्याचा हा वेडेपणा पाहून कल्चरल मिनिस्टरने शफकला थेट पुण्याला फिल्मइस्टिट्यूटमध्ये शिकायला पाठवलं. तिथं तो सहा वर्षं होता. तेव्हा तो ‘अलेक्झाई’ हे नाव लावायचा. फिल्म एडिटिंग, डायरेक्शन, पटकथा लिहिणं एवढे तीन कोर्सेस त्यानं केले. परत आल्यावर त्याला ब्रिटिश कौन्सिलची स्कॉलरशिप मिळाली. लगेच तो लंडनच्या फिल्म इस्टिट्यूटमध्ये गेला. तिथला कोर्स संपल्यावर ब्रिटिश कौन्सिलनं त्याला थेट लंडन ते काबूल असे विमानाचे तिकिट दिले. शफकला तर युरोप पहायचा होता. म्हणून मग त्याने सरळ ते तिकिट विमानकंपनीला परत केले. पैसे परत घेतले आणि बस, आगगाडी, जे काय वाहन मिळेल त्याने तो युरोप हिंडला. बहुतेक वेळा फुकटची लिफ्टच घेतली; पण संपूर्ण युरोप हिंडून आला.




परत अफगाणिस्थानात आल्यावरही मोठं काम मिळालंच नाही. शूटिंगसाठी येणाऱ्या मोठमोठ्या पाश्चात्य डायरेक्टर्सच्या हाताखाली काम करायला मिळालं हा मात्र फार मोठा फायदा झाला. 'धर्मात्मा' करणाऱ्या फिरोजखानबरोबरही त्याने डायरेक्टर म्हणून काम केले. ओमर शेरीफबरोबर एकदा काम केले. अधूनमधून एखादी छोटीशी डॉक्युमेंटरी करीत असे. एका अफगाण फीचर फिल्मच्या सह-दिग्दर्शकाचंही काम केलं आणि शेवटी दोन वर्षांपूर्वी 'गुलाम–ए–इश्क'ची कथा त्यानं लिहिली, पटकथा तयार केली. लोकांकडून पैसे उसने घेऊन जमवले, आपल्या मित्रमंडळींनाच बाबापुता करून, सिनेमात फुकट काम करायला कसंबसं तयार केलं. आपल्या वाग्दत्त वधूला हिरॉईनचं काम करणं भाग पाडलं आणि एक बेताचा मुव्ही कॅमेरा आणि फक्त दोन लाइटस् या भांडवलावर संपूर्ण साडेतीन तासांची फीचर फिल्म काढली.

गुलाम–ए–इश्कची गोष्ट तसं म्हटलं तर अगदी सरधोपट आहे. एक गरीब शेतमजूर, त्याचा १०–१२ वर्षांचा मुलगा गुलाम. गावातली पोरं, जमीनदाराच्या मुलाच्या पुढारपणाखाली या गुलामची वाटेल तशी टिंगलटवाळी करतात, त्याचा अपमान करतात. त्याला सगळं मुकाट्यानं सहन करावं लागतं. एक दिवस असाच अपमान सोसून घरी येतो तर त्याच्या आईवर कोणी तरी अत्याचार करून तिला मारून टाकलेलं असतं. गुलाम ओरडत-रडत बापाकडे शेतावर जातो. बाप जमीनदाराकडे तक्रार घेऊन जातो. तिथं त्याची दाद कशी लागणार? कारण स्वतः जमीनदारच त्या प्रकाराला जबाबदार असतो. जमीनदार आपल्या नोकरांना या भांडखोर, बेमुर्वतखोर माणसाला फटके द्यायला सांगतो. फटके देण्याचं काम सुरू होतं तेव्हा जमीनदाराचा १०–१५ वर्षांचा मुलगा गुलामला सतत त्रास देणारा, एका झाडाच्या सावलीत गादीवर बसून फटके मोजत असतो. लोक फटके द्यायचे थांबले की म्हणतो, 'आणखी फटके द्या मला मोजायचं आहे' आणि एका पडक्या भिंतीआड लपून, असहाय, संतापलेला, अपमानित झालेला गुलाम हा सगळा प्रकार पाहात असतो. माराने अर्धमेला, बेशुद्ध झालेल्यया गुलामच्या बापाला पाहून जमीनदार नोकरांवर रागावतो आणि त्याला नाल्यात फेकून द्यायला सांगतो. बेशुद्ध बापाचं शरीर हळूहळू पाण्याच्या तळाशी जातं. पाण्यावर काही वेळ बुडबुडे येतात. कुणाला काही पत्ताही लागत नाही!

गुलाम मात्र मोठा होतो तो दरोडेखोर म्हणूनच. जमीनदाराच्या अत्याचाराला बळी पडलेली ५–२५ माणसं त्याच्याभोवती गोळा झालेली असतात. जमीनदाराची माणसं सतत त्याच्या मागावर असतात. गुलामची एकच इच्छा, की जमीनदाराचा सूड उगवायचा! त्याचा मुलगा दारू-बायांमध्ये वाया गेलेला असतो. तरुण आणि सुरेख मुलगी असते, ती मात्र गावामध्ये हिंडून औषधपाणी करीत असते. गुलाम एकदा जमीनदाराला लुटतो आणि सापडतोही; पण त्याचे लोक त्याला सोडवून नेतात. शेवटी गुलाम जमीनदाराच्या मुलीलाच पळवून आणतो. आईचा सूड त्याला उगवायचा असतो; पण गुलाम त्या मुलीशी गैर वागूच शकत नाही. एवढंच नव्हे तर

हळूहळू तो तिच्या चक्क प्रेमातच पडतो. तिलाही गुलामबद्दल जे काय तिनं वेडंवाकडं ऐकलेलं असतं तेही खोटं असल्याचं आढळून येतं. गावातल्या गरीब लोकांची सहानुभूतीही गुलामलाच असते. ती मुलगी एक दिवस पळून जाते !

आता गुलामला मारण्यासाठी जमीनदाराची माणसं त्याच्या मागावर जातात आणि जमीनदाराची मुलगी त्याला वाचवण्याच्या खटपटीत असते. ती पोलिसांना बोलावून आणते. मग शेवटी ओबड-धोबड, खडकाळ, उजाड डोंगरावरून तुफान घोडदौड, एकमेकांचा पाठलाग, गोळीबार सुरू होतो आणि एकदमच, बोलता बोलता एखाद्याचं वाक्य अर्धवटच थांबून जावं, त्याप्रमाणे धमाधम मारामारी चालू असताना एकदम सिनेमाच संपतो !

खरं म्हणजे सिनेमा संपत नाही. मूळ सिनेमा संपतो तेव्हा गुलामला पकडून पोलीस घेऊन जातात असे शफक तुरेलायने दाखवलेले होते; पण फिल्म पूर्ण होऊन त्यानंतर जी थिएटरवर दाखवली जायची, त्या काळामध्ये दाऊदखानचे सरकार जाऊन तराकीचे सरकार आलेले होते. दाऊदखानच्या जमान्यात दरोडेखोर गुलामला पोलीस घेऊन जातात असं दाखवणं हे ठीकच होतं; पण डाव्या विचारसरणीच्या, क्रांतिकारी सरकारच्या जमान्यात अत्याचारी जमीनदाराच्या विरुद्ध उठलेल्या गुलामला पोलीस पकडतात असं कसं दाखवायचं ? हा मोठाच प्रश्न पडला सरकारला. तेव्हा मग सरकारने सिनेमाच्या शेवटालाच कात्री लावली ! त्यातून मग मी असा अर्थ काढला की, जमीनदाराच्याविरुद्ध उठलेल्या शेत-मजुराचा आणि जमीनदाराचा लढा चालूच राहणार आहे, तो कधीच संपणार नाही....

आपल्या सिनेमाला अशी मध्येच कात्री लावली म्हणून शफकला खूप वाईट वाटलं, संताप आला; पण मग त्यानं एक वेगळीच शक्कल लढवली. सिनेमाच्या शेवटाचा मी जो अर्थ लावला होता त्याच्याही पुढं शफकनं मजल मारली. तो म्हणाला, 'मी आता या सिनेमाचा दुसरा भाग काढीन. त्याची गोष्ट अशी असेल की, माझ्या पहिल्या सिनेमाचा मूळचा शेवट त्यांना ठेवावाच लागेल. दुसऱ्या भागात मी असं दाखवीन की, पोलीस गुलामला तुरुंगात टाकतात. तिथं त्याची व कम्युनिस्टपार्टीच्या वर्कर्सची गाठ पडते. जमीनदाराविरुद्ध चिडलेल्या गुलामच्या विचारांना राजकीय विचारांची बैठक मिळते. तो खूप मोठा कम्युनिस्ट-लीडर होतो वगैरे वगैरे...अशी गोष्ट लिहिल्यावर आमचं हे नवं सरकार सिनेमाच्या दुसऱ्या भागाला परवानगी तर देईलच; पण सगळ्या सवलतीही देईल आणि मुख्य म्हणजे पहिल्या भागाच्या शेवटाला एकदमच अशी कात्री लावणार नाही. त्याबद्दल त्यांना मला विचारावंच लागेल.' हे बोलताना शफक तुरेलाय याच्या डोळ्यात विलक्षण मिस्किल भाव होते.

मला वाटलं होतं की, शफक तुरेलाय हा नव्या सरकारच्या मर्जीतला माणूस, तेव्हा तोही डाव्या विचारसरणीचाच असावा. नवीन सरकार आल्यावर तो तुरुंगात तर गेला नव्हताच; पण गुलाम-ए-इश्कच्या प्रिमिअरचा केवढा थाट झाला होता. अर्थातच भारतीय सिनेमांच्या प्रिमिअरशी त्याची तुलनाही होऊ शकत नाही. तरी पण कल्चरल मिनिस्ट्रीचा डेप्युटी मिनिस्टर, इतर महत्त्वाचे ऑफिसर्स समारंभाला आले होते. भाषणं, हारतुरे, सगळं काही व्यवस्थित झालं होतं. खरे म्हणजे शफक तुरेलाय हा सुरुवातीला म्हणजे ८-१० वर्षांपूर्वी अगदी कट्टर मार्क्सिस्टच होता. शोले पार्टीचा म्हणजे माओवादी; पण पुण्यातल्या फिल्म इन्स्टिटयूटमध्ये राहिला आणि हळूहळू त्याच्या विचारसरणीत फरक पडू लागला. पुण्याला असताना केरळच्या मार्क्सिस्ट विद्यार्थ्यांशी त्याची दोस्ती होती. मार्क्सिस्ट लोक बडबड फार करतात ही त्याची तक्रार आहे. पुण्यानंतर लंडनला राहिला, युरोप हिंडला आणि आता तर कम्युनिझमला अतिशय नावच ठेवतो.

तो म्हणाला, 'कम्युनिझम जिथं असेल तिथं माणसाला मोकळेपणानं श्वासही घेता येत नाही, तिथं मी सिनेमे कसे काढणार ?'

'ते का ? रशियामध्येही चांगले सिनेमे तयार होतातच ना ?' मी मुद्दामहून विचारलं.

'होतात ना. टेक्निकली देखणे सिनेमे असतात रशियाचे; पण कसदारपणाच्या दृष्टिकोनातून पाहिलं तर निराशाच पदरी यावी. झापडं लावल्यासारखे एकाच विशिष्ट दृष्टिकोनातून, बहुतकरून कम्युनिझमचा प्रचार करण्यासाठीच तयार केलेले असतात त्यांचे सिनेमे. अधूनमधून एखाददुसरा चांगला सिनेमा, चांगला डायरेक्टर प्रसिद्धीस येतो; पण मग राजकीय वर्तुळात काही तरी फरक पडतो, वरची माणसं बदलतात, पॉलिसीज बदलतात आणि मग पुन्हा नेहमीसारखेच ठोकळेबाज चित्रपट निघू लागतात. आपल्या मनाला पटेल असं काही तरी, स्वतंत्रपणानं कोणी काही करूच शकत नाही. म्हणून तर दर दोन-चार वर्षांनी रशियातला स्वतंत्र बुद्धीचा मनुष्य या ना त्या मार्गानं रशियाबाहेर निघूनच जातो. हे सगळं भयंकर निराशाजनक आहे, एखाद्या कलावंताचा मनोभंग करणारं आहे. मला माहीत आहे ना, त्याचं दुःख काय असतं ते, मी स्वतःच त्यामध्ये गळाभर बुडालो आहे.'

शफक तुरेलायचं खरं दुःख हे आहे. ते एका कलावंताचं दुःख आहे. तो स्वतः एक संवेदनाक्षम कलावंत आहे हे 'गुलाम-ए-इश्क' पाहूनच लक्षात येतं. खरं म्हणजे ती एक सरळ, साधी, ढोबळ कथा आहे; पण त्याने त्या कथेचं सोनं केलं आहे. गुलामच्या बापाला फटके मारले जातात तेव्हाचा प्रसंग, नाल्यामध्ये बापाचं शरीर हळूहळू तळाला जातं तो प्रसंग, गुलामच्या मागे जमीनदाराचे लोक लागतात तेव्हा त्याचं बेदरकारपणानं गावातून हिंडणं, जमीनदाराच्या मुलीला पळवून आणल्यानंतरची त्याच्या मनाची घालमेल, रात्रीची घोडदौड, एकदा गुलामला स्वप्न पडतं की, आपण त्या मुलीबरोबर एका तळयाच्या काठी हातात हात घालून चालत आहोत आणि संपूर्ण चित्रपटभर दाखवलेला प्रकाश-सावल्यांचा खेळ, असे किती तरी प्रसंग आहेत की ते अत्यंत परिणामकारक वाटतात. पडद्यावरच्या कवितांसारखे हे प्रसंग कुठल्याही उत्कृष्ट दिग्दर्शकापेक्षा कमी नाहीत. फिल्मची लांबी जराशी जास्त आहे, संकलन जास्त काटोकोरपणानं व्हायला हवं होतं हा एकच दोष सांगता येईल. बऱ्याच वेळा सत्यजित रे यांची फार छाप पडलेली दिसते. मी तसं म्हटल्यावर शफक म्हणाला, 'मला रे यांचे सिनेमे आवडतात हे खरंच. पुण्याला होतो तेव्हा त्यांच्या चित्रपटांचा मी अभ्यास केला होता. त्यांना मी भेटलोही आहे. कळत-नकळत याचा परिणाम झाला असेलही माझ्यावर. तसं म्हटलं तर नावाजलेल्या

पाश्चात्य दिग्दर्शकांपेक्षा रे मला जवळचे वाटतात. कारण आपले दोघांचेही देश पुष्कळसे सारखेच आहेत. आपली गरिबी, आपले प्रश्न, आपले लोक यामध्ये खूपच साम्य आहे.'

इथे गुलाम-ए-इश्क मधल्या एका प्रसंगाचा आवर्जून उल्लेख करायला हवा. जमीनदाराच्या घरी एक मुलगी नाच करते आहे, ५–७ जण भोवतीनं बसून तिचा नाच पहात आहेत. वाहवा! वाहवा! करीत आहेत. त्या वेळी जमीनदाराचा एक नोकर एका कोपऱ्यात हातात गॅसची बत्ती धरून उभा आहे. त्या नाचणाऱ्या मुलीवर प्रकाश पडला पाहिजे हे त्याचं काम. ती मुलगी जशी जाईल तसाच हाही लगेच पुढे सरकतो, मागे सरकतो; पण तो नोकर तिच्याकडे पाहू शकत नाही. त्याची नजर सतत शून्यात. एखाद्या खांबासारखा निर्जीव आहे तो. जमीनदारांकडे काम करणाऱ्यांची परिस्थिती किती वाईट आहे वगैरे कसलीही भाषणबाजी संपूर्ण सिनेमात कुठेही नाही. एकंदरीत सगळा सिनेमा बराचसा अबोलच आहे. तरीसुद्धा या प्रसंगासारखे प्रसंग विलक्षण बोलके आहेत. खूप परिणाम साधून जातात.

'मी स्वत: बऱ्याच कथा लिहिल्या आहेत. खूप चांगले चांगले चित्रपट काढायचे केवढे मोठाले बेत होते माझे आणि कलेच्या धुंदीत वाहवून जाऊन मी आर्ट-फिल्मच फक्त काढणार नव्हतो. कारण तसे चित्रपट सर्वसाधारण लोकांना आवडत नाहीत हेही मला माहीत आहे आणि लोकांना माझे चित्रपट आवडल्याशिवाय मला पुन्हा चित्रपट काढण्यासाठी, पहिल्या चित्रपटातून माझे पैसे मला परत मिळणार नाहीत हेही मला माहीत आहे. त्याची जाणीव ठेवूनच मी चित्रपट काढणार होतो आणि एकदा एक चांगला चित्रपट-दिग्दर्शक म्हणून माझं बस्तान बसल्यावर मग मी माझ्या मनाप्रमाणे चित्रपट काढणार होतो; पण आता हे खल्की सरकार मला कितपत काम करू देणार आहे कुणास ठाऊक? पहिल्या झटक्यालाच त्यांनी माझ्या चित्रपटाचा शेवटच मला काहीही न सांगता-सवरता कापूनच टाकला. त्यावरून पुढे काय होईल त्याची कल्पना करता येतेच आहे.'

'सध्या तुम्ही काय करता आहात मग?' मी भीतभीतच विचारलं. कारण मध्ये मी ऐकलं होतं की, शफक तुरेलायला खल्की सरकारने तुरुंगातच टाकलंय म्हणुन.

'विशेष महत्त्वाचं असं काहीच करीत नाही. उगाचच 'फाइलबाजी' चालली आहे. फालतू गप्पांमध्ये एवढा वेळ जायला लागला की, मला माझं स्वत:चं असं काम करता येईना म्हणून मी विशेष कुणालाच भेटेनासा झालो. सध्या तरी इथं एखादा माणूस ५–७ दिवस दिसला नाही की लोकांना कळून चुकतं की तो तुरुंगातच आहे म्हणून. त्यामुळं लोकांना वाटलं मलाही सरकारनं तुरुंगातच टाकलं आहे! सध्या तराकी यांच्या एका कथेवर चित्रपट काढायचं सरकारनं ठरवलं आहे. त्याच्या दिग्दर्शनाचं काम मिळण्याची शक्यता आहे. त्याच खटपटीत आहे मी. क्रांती झाल्यावर नव्या मिनिस्टरनं मला बोलावून सांगितलं की, 'तू चांगला कलावंत आहेस. कलावंत हा राजकारणाच्या पलीकडचा असतो. खल्की सरकारला तुझ्यासारख्या माणसांची जरूर आहे. तू तुझं काम मनापासून कर.' तेव्हा मी आता असं ठरवलं आहे की, या सरकारच्या विरुद्ध मी गेलो तर सरळ तुरुंगातच जाईन. त्यापेक्षा आहे त्या परिस्थितीशी जुळवून घ्यायच आणि आपलं काम चालूच ठेवायचं. आज नाही उद्या ही परिस्थिती बदलल्याशिवाय रहाणार नाही, याची खात्री आहे मला. तेव्हा मग मला माझ्या मनासारखे चित्रपट काढता येतील. माझे चित्रपट कम्युनिझमच्या विरुद्धच असतील असंही नाही. खरं म्हणजे कोणताही 'इझम' आला तरी मनुष्यस्वभाव बदलत नाही, माणसाचे एकमेकांशी संबंध बदलत नाहीत, मूळ मानवी वृत्ती बदलत नाही. त्यावरच मला माझे चित्रपट काढायचे आहेत; पण त्यासाठी आज जुळवून घ्यायलाच हवं याची पूर्ण जाणीव आहे मला; पण तरीसुद्धा एखादे वेळी सगळं असह्य होतं, तेव्हा असं वाटतं आपल्या कथांची हस्तलिखितं घ्यावीत आणि सरळ हिंदुस्थानात पळून जावं!'

मला एवढं आश्चर्य वाटलं! साधारणपणे असे लोक पळून जातात ते युरोप अमेरिकेत आणि हा आपला म्हणतोय की, मी पळून गेलो तर हिंदुस्थानातच जाईन; पण शफक तुरेलाय याला आपला भारत बेहद पसंत आहे. पुणे शहराच्या तर तो प्रेमातच पडलाय. आपली आमटी त्याला अतिशय आवडते आणि आश्चर्य म्हणजे मोठ्या कौतुकानं तो ते सांगत होता. कारण भारतीय लोक 'दालरोटी' खातात म्हणून त्यांची सर्रास टिंगल चालते इथे. अर्थात त्याला हिंदुस्थानी दाल आवडते हे त्याच्या बायकोला विशेष आवडलं नाही. आमटीमध्ये एवढं आवडण्यासारखं काय ते तिला कळतच नव्हतं; पण तो मात्र मारे वर्णन करून सांगत होता की, आमटी किती छान लागते म्हणून.

तिला मी विचारलं, 'तू यापुढं सिनेमात कामं करशील ना?'

'मुळीच नाही. मला आपलं संसार, घर, मुलं हेच आवडतं. सिनेमात काम करणं म्हणजे अतिशय कटकटीचं काम आहे.' शफकची बायको म्हणाली.

शफक म्हणाला, 'हिंदुस्तानसारखा देश नाही. मी एवढं हिंडलो, एवढे देश पाहिले, इतके लोक पाहिले; पण मला कुठंच घरच्यासारखा आपलेपणा, मोकळेपणा वाटला नाही. तो फक्त हिंदुस्थानात वाटला. मोठा गंमतीशीर देश आहे हं तुमचा. काय वाटेल तो नोकरीधंदा करायचं स्वातंत्र्य आहे तुम्हाला. आपल्या सरकारला उघडपणानं नाव ठेवायचंही स्वातंत्र्य तुम्हा लोकांना आहे. एकदा फिल्म इन्स्टिट्यूट सोडल्यावर हिंदुस्थानात माझं खरं म्हणजे काही काम नव्हतं तरी मी दोनदा जाऊन आलो. उगाचच याला भेट त्याला भेट करायला.'

शत्रुघ्न सिन्हा फिल्म इन्स्टिट्यूट पासूनचा त्याचा दोस्त.'धर्मात्मा' काढणारा फिरोजखान, हेमामालिनी अशा लोकांशी मैत्री जुळलेली. त्यांच्या गंमतीच्या आठवणी सांगत होता. शत्रुघ्न सिन्हा त्याला 'लठ्ठ कसा होऊ?' म्हणून विचारायचा, हेमामालिनी ओमर शेरीफची सतत चौकशी करायची, फिरोजखान शूटिंगसाठी इथं आला होता तेव्हा त्यानं जवळजवळ वीस हजार भारतीय रुपये खैरात केले होते. मग म्हणाला, 'आता जर सरकारनं परवानगी दिली तर ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये मी पुन्हा एकदा बायकोला घेऊन हिंदुस्थानात जाणार आहे. शत्रुघ्न सिन्हा, फिरोजखान, हेमामालिनी वगैरे लोक मला म्हणाले होते की, तू कधीही इकडे ये आम्ही तुला मदत करू...' शफकच्या डोळ्यांत भावुक भाव तरळून गेले.




आपल्या बॉम्बे फिल्म इंडस्ट्रीत शफक तुलेरायसारखा माणूस कसा काय बसेल याची मला मात्र कल्पनाही करता येत नाही.

सर्वसाधारणपणे कुठल्याही देशातले सुरुवातीचे चित्रपट बरेचसे ओबडधोबड, भडक असतात. म्हणूनच गुलाम–ए–इश्क–बद्दल–मनात उत्सुकता होती. हा अफगणिस्थानात तयार झालेला तिसरा किंवा चौथा चित्रपट आहे. सगळ्या तऱ्हेच्या अडचणींना तोंड देऊन काढलेला. पैसा अगदी कमी. (भारतीय दोन लाख रुपये.) कॅमेरा, लाइटस् वगैरे तांत्रिक मदत जरुरीपेक्षा खूपच कमी, ॲक्टिंगचा ओ की ठो माहीत नसलेले कलाकार. शफक सांगत होता. ' माझ्या सिनेमात दोनच मुली. त्यांना अमुक करा, असं करा वगैरे जरा रागावन सांगितलं, की त्या आपल्या कोपऱ्यात जाऊन रडतच बसायच्या ! ' या सगळ्या अडचणींना तोंड देऊन काढलेल्या सिनेमाला हिंदी आणि पाकिस्तानी सिनेमांशी चढाओढ करायची होती. तरी हल्ली आपल्याकडच्या हिंदी ' शिणिमांनाही ' मागं सारतील अशा अत्यंत लोकप्रिय इराणी सिनेमांना इथे बंदी आहे म्हणून, नाही तर सामना त्यांच्याशीही! एवढी स्पर्धा असूनही गुलाम–ए–इश्क चांगला चालला आहे. आपली भाषा बोलणारी, आपल्यासारखीच माणसं रुपेरी पडद्यावर पहाणं अफगाण माणसाला आवडलं. हिंदी चित्रपट इथं अत्यंत लोकप्रिय असले तरी शेवटी या लोकांच्या दृष्टीनं ते चित्रपट म्हणजे fantacies च आहेत. (आपल्याला सुद्धा ! ) त्या तुलनेमध्ये गुलाम–ए–इश्क हा बराचसा वास्तववादी. म्हणूनच अफगाण माणसाला जवळचा. हा चित्रपट गेल्या वर्षी दिल्लीला झालेल्या फिल्म फेस्टिव्हलला पाठवावा म्हणून खूप खटपट चालू होती; पण चित्रपटाच्या शेवटाच्या घोळामध्ये अडकून खल्की सरकारने तो चित्रपट पाठवलाच नाही ! त्याचं फार वाईट वाटलं शफकला.

आपल्याकडचे बाबूराव पेंटर, दादासाहेब फाळके अगदी सत्यजित रे सुद्धा–या सगळयांनाच निरनिराळ्या अडचणींना तोंड देऊनच आपापले चित्रपट काढावे लागले; पण त्यांच्या अडचणींची जात वेगळी होती. पैसा कमी, तांत्रिक माहिती आणि मदत कमी, यासारख्या दूर होऊ शकणाऱ्या अडचणींनाच त्यांना तोंड द्यायचं होतं. त्यांच्या प्रयत्नांचं कौतुक करणारे, मदत करणारे मूठभर लोक तरी त्यांच्या मागे होते. सत्यजित रे यांना तर सरकारची मदतही मिळाली होती; पण शफकच्या अडचणी अगदी वेगळ्या प्रकारच्या आहेत. दूर होऊ न शकणाऱ्या आहेत. म्हणूनच त्याची धडपड कौतुकास्पद आहे. खल्की सरकारनं त्याला तुरुंगात टाकलं नाही तरी पण त्याच्यावर सतत लक्ष असतं. तो जातो कुठे, बोलतो कुणाशी, काय यावर सारखं लक्ष असतं. आपल्या वरच्या अधिकाऱ्यांना, मंत्र्यांना कसलाही प्रकारचा विरोध तर जाऊंदेच पण मतभेदही दाखवून उपयोगाचा नाही. कारण सगळेच पार्टी वर्कर्स, मार्क्सिझमच्या अंमलाखाली असलेले, कसलाही विरोध सहन न होणारे. उद्या बरे दिवस येतील या आशेवर आला दिवस ढकलणारा हा कलावंत आमच्याकडे आला तेव्हा म्हणाला, ' तुमच्या घरावरून दोनदा चकरा मारल्या, आजूबाजूला कोणी बघत नाही ना याची खात्री करून घेऊनच तुमच्या घरात शिरलो आम्ही. हे आमच्या देशात कलावंताला मिळणारं स्वातंत्र्य ! ' ◘

# इन्साफ

रिझवान हुसेन एकदा एका अफगाण माणसाला घेऊन घरी आले.

रिझवान हुसेन हे भारतीय. अलिगढ युनिव्हर्सिटीमध्ये इंग्रजीचे प्रोफेसर गेली ५–६ वर्षे काबूल युनिव्हर्सिटीमध्ये प्रोफेसर आहेत. रिझवानने ओळख करून दिली, की हा अन्वर कोहजाद पूर्वी अलिगडमध्ये माझा विद्यार्थी होता. एम. ए. झाल्यावर अमेरिकेत जाऊन तिथंच सेटल झालाय !

कोहजाद म्हणाला, ' माझं खरं नाव आहे महंमद खान अन्वर-खान, पण ते आपल्या आशियायी लोकांसाठी. (म्हणजे हा अस्सल पठाण.) अमेरिकेत गेल्यावर बघितलं तर तिथं खूपच खान आणि शेख आलेत आता. मग मी माझ्या नावातला महमद आणि खान काढून टाकला. आणि कोहजाद हे नाव घेतलं. कोहजाद म्हणजे पर्वताचा पुत्र. मग काय, अमेरिकन लोक एवढे खूष झाले या नावा-वर ! त्यांना हवं तसं रोमँटिक एक्झॉटिक नाव आहे हे ! त्या जोरावर वर्षाच्या आत झकासपैकी अमेरिकन मुलगी बायको पण झाली माझी ! '

गप्पांना सुरुवात तर चांगली झाली होती. मग तो पर्वताचा पुत्र आणि माझा नवरा, व्हिस्कीमध्ये बर्फ टाकावा की बर्फावर व्हिस्की–टाकावी याबद्दलचे फायदे तोटे एकमेकांना गंभीरपणानं सांगू लागले होते. तेव्हा रिझवान हळूच मला एकीकडे म्हणाला, ' भाभीजी, आप कहानियाँ, नॉव्हेल वगैरे लिखती हैं ना ? मैं आपको एक ऐसी थीम दुंगा की–आप भी क्या याद करेंगे ! इस अन्वरको जरा गौरसे देख लेना, कल आकर इसकी स्टोरी बताऊंगा ! '

एखाद्या ग्रीक देवासारखा देखणा होता तो पर्वताचा पुत्र! वागणं-बोलणं कमालीचं आदबशीर, आर्जवी, रिलॅक्स्ड. इथले खानदानी अफगाण लोक बोलाय–वागायला अत्यंत सुसंस्कृत. त्यावर आता अन्वरच्या वागण्यावर अमेरिकन पॉलिश चढलं होतं. किती तरी विषयांवर चर्चा करीत होता, बोलत होता. स्कॉलर वगैरे मुळीच नव्हता; पण अतिशय pleasant personality. याची काय 'स्टोरी' असेल ? प्रेमभंग ? generation gap ? की आजच्या बंडखोरांच्या काही वेगळ्याच राजकारणात गुंतला होता ? माझी कल्पनाशक्ती धावत होती.–

दोन–चार पेग मारून झाल्यावर मध्येच एकदा बोलता बोलता अन्वर म्हणाला, ' एखाद्याचा खून केला तर तो सरळसरळ गुन्हाच ठरेल की इतर गोष्टीवरही त्याचं पापपुण्य अवलंबून असावं ? '

मी दचकले. आता तर माझी खात्रीच पटली, की हा माणूस सरळ सरळ कुणाचा तरी खून करून अमेरिकेतून अफगाणिस्थानात पळून आलाय आणि आता पस्तावलाय, घाबरलाय. त्याचीच गोष्ट रिझवान सांगणार असेल !

पण रिझवाननं सांगितलेली गोष्ट ऐकून मी अक्षरशः हादरले. विसावं शतक आता संपायला आलं आणि अजूनही अशा गोष्टी कुठं तरी घडत असतात ! माझ्यातल्या कथालेखिकेनं मला बजावलं, ' यावर तू कादंबरीच लिहिली पाहिजेस ! केवढं जबरदस्त कथाबीज आहे त्यामध्ये. केवढा प्रचंड संघर्ष आहे त्यामध्ये ! ' आज नाही उद्या कदाचित ही कादंबरी मी लिहीनही.

अन्वर हा पुश्तूनवाली पठाण टोळीमधल्या एका लहानशा 'खानखेल'च्या खानचा मुलगा. पाकिस्तान, अफगणिस्थान, बलुचिस्तान यांच्या सरहद्दीवरच्या डोंगरदऱ्यांच्या बेचक्यात, १००–१५० घरांच्या खेड्यांपैकी एका खेड्यात रहायचा. लहानपणापासून अत्यंत चौकस बुद्धी म्हणून खेड्यातल्या इतर मुलांपेक्षा जास्त ईमानदारीनं गावच्या मुल्लाकडे जास्तीत जास्त शिकला. त्या मुल्लाला अगदी धन्यधन्य झालं आणि त्याच्याच सांगण्यावरून जलालाबादच्या शाळेचं शिक्षण त्यानं पुरं केलं. त्यानंतर काबूल, अलीगढ करून अमेरिकेत गेला आणि तिथेच सेटल झाला. अर्थातच तो कायमचा तिकडे रहा-णार हे त्याच्या घरच्या माणसांना माहीत नाही. त्याच्या शिक्षणा-बद्दल, परदेशी जाण्याबद्दल कोणी नाराज झालं नाही. त्याच्या बापाला काका–मामाला वाटतं, राहीना का तिकडे काही वर्षं. इतका डोंगरा-एवढा शिकला, अमेरिकन बायको केली, दोन मुलं आहेत. तिथे एवढे पोतंभर पैसे मिळवतो, इज्जतीनं रहातो, आमच्या खानदानाचं नाव रोशन झालं. आज नाही उद्या तो काय परत आल्याशिवाय का रहाणार आहे ?

अमेरिकेत राहून दहा वर्षं झाली. राज्यक्रांतीच्या वगैरे बातम्या ऐकल्या. त्याला रहावेना. हातात अमेरिकन नागरिक म्हणून पासपोर्ट, तिथं भीती कसली ? एक दिवस आपल्या सगळ्या ' बिरा-दरी'ला भेटायला म्हणून इथं आला. मुलगा भेटायला आला म्हणून आई–बापाला अगदी धन्यधन्य झालं ! उंट कापला. सगळ्या खान-खेलला दावत केली. अन्वरही खुशीत होता. अंगावरचा अमेरिकन सूट उतरवून पठाणी कपडे चढवले, विसरून गेलेला नमाज पढू लागला खांद्यावर बंदूक लटकावून पाखरं मारत हिंडू लागला. बुजुर्ग लोक म्हणाले, अमेरिकेत दहा वर्षं राहिला म्हणून काय झालं ? अस्सल खानदानी रक्त आहे त्याचं ! आपले रीतीरिवाज कसा विसरेल ?

पण मग एक अशी घटना घडली, की अमेरिकन अन्नावर पोसलेलं त्याचं खानदानी पठाणी रक्त त्याच्या नसानसांतून उलटसुलट वाहू लागलं.

त्याची पंधरासोळा वर्षांची बहीण, नेहमीप्रमाणे आपल्या मैत्रिणीं-बरोबर मेंढरं चरायला घेऊन गेली होती. तिथं गावातलाच तिच्या बरोबरीचा एक मुलगा तिच्या जवळ येऊन तिला म्हणाला, ' तू किती सुंदर आहेस, मला फार आवडतेस ! ...'

त्या मुलीनं त्या मुलाला पाहिलेला होता. दिसायला तो काही फारसा देखणा वगैरे नव्हता आणि शिवाय फारसा श्रीमंत जमीन-दाराचा मुलगाही नव्हता तो. आईला सांगितलं असतं तर तिनं ठोकच दिला असता आणि अगदी आदळआपट करून, त्रागा करण्या-एवढा देखणाही नव्हता. तिच्या कपाळावर आठ्या पसरल्या. ती हळूच म्हणाली, ' ठीक आहे. मी सांगते माझ्या भावाला ! '

' सांगते माझ्या भावाला ' हे वाक्य ऐकल्यावर ते कोवळं पोरगं घाबरलं, चाचरत बोलू लागलं. त्याच्याकडे पाठ करून मुलगी थेट घरी आली. अन्वर समोर उभी राहून सगळी हकीगत तिनं त्याला

सांगितली. घरातल्या लोकांनाही कळलीच. संध्याकाळी म्हातारी माणस जमली तेव्हा सर्वानुमते ठरलं, की त्या मुलानं प्रत्यक्ष त्या मुलीशीच असं काही बोलून तिची बेइज्जत केली आहे, तिच्या खानदानाची बेइज्जत केली आहे. त्याला ती मुलगी आवडलीच होती तर त्यानं आपल्या आईला, आत्याला सांगायचं होतं. त्या मग मुलीच्या आईशी, आत्याशी बोलल्या असत्या. तसाच रिवाज नव्हता काय ? तो रिवाज त्यानं मोडला होता. आमचा खानखेल एवढा पाक, की आमच्या पोरीबाळी आमच्या गावात कधी बुरखासुद्धा घालत नाहीत. त्याचा गैरफायदा घेतला या मुलानं ! त्याला आता एकच शिक्षा ! अन्वरला बहिणीनं तिची खोड काढलेल्या मुलाचं नाव सांगितलं होतंच. त्या मुलाला आता अन्वरनं मारायलाच हवं. कायदा तसाच होता. तरच इन्साफ होईल...

अन्वर भीत होता तो याच कर्माला. आपल्या पुश्तुनवाली पठाणांचे सगळे रीतिरिवाज त्याला माहीत होतेच; पण त्याला वाटत होतं इतक्या दहा वर्षात इथं काही तरी सुधारणा झाली असेल. तारुण्यसुलभ भावनेच्या साध्या प्रगटीकरणासाठी एवढी भयंकर शिक्षा ?

त्या मुलाचा चेहरा देखणा नव्हता तरी कोवळा होता. एका नव्याच भावनेच्या आविष्कारामुळं चकाकत्या डोळ्यांचा, व्याकूळ झालेला, स्वतःबद्दल भरपूर आत्मविश्वास असलेला त्या मुलीला काही म्हणायचाच अवकाश की, ती लगेच आपल्या आईला माझ्याबद्दल सांगणारच याची खात्री असलेला. अमेरिकेत एवढा मुलगा आतापर्यंत शंभर मुलींना घेऊन हिंडला असता. या मुलानं तर त्याच्या बहिणीला फक्त एवढंच सांगितलं होतं की, ती फार सुंदर होती. त्याला आवडत होती —! एवढ्याशाच कसूरीसाठी त्या पोराला गोळी घालायची ? अन्वरच्या मनाला हे पटतच नव्हतं. कुणालाही, कसल्याही गुन्ह्यासाठी मारायचा मला काय अधिकार ? त्यानं गुन्हा केलाच असेल तर त्याला कायद्यानं शिक्षा द्यावी; पण कायदाच हातात घेणारा मी कोण ? कायदा स्वतःच्या हातात घेणारे हे कसले रीतिरिवाज ? आणि नुसतेच रीतिरिवाज नव्हेत तर त्याला त्याच्यापुरतं इस्लामचं अधिष्ठान होतं. पिढ्यान्‌पिढ्या तसंच घडत आलं होतं.

अमेरिकेत तरुण पोरं—काय वाटेल तशी वागत होती. सर्रास वाटमारी करत होती. खून-मारामाऱ्या करायची; पण जाणूनबुजून ती पोरं गुन्हेगारी प्रवृत्तींचीच होती; पण इथे तर रीतिरिवाज म्हणून, खानखेलचा कायदा म्हणून, इन्साफ करायचा म्हणून, धर्माचं अधिष्ठान होतं म्हणून त्याला एका निष्पाप कोवळ्या मुलाचा खून करायचा होता. अन्वरच्या लेखी तो गुन्हा होता; पण खानखेलच्या लेखी अन्वरचं ते पवित्र कर्तव्य होतं.

अन्वर दहा वर्षं अमेरिकेत राहून पार बदलून गेला होता. त्यानं जग बघितलं होतं. आधुनिक सुसंस्कृत जगाचे नीतिनियम त्याला समजत होते आणि तेच त्याला आता योग्य वाटत होतं.

त्यानं आपल्या बापाला सांगितलं, 'मी काही त्या मुलाला मारणार नाही. त्याला मारून टाकण्याएवढा त्याचा गुन्हा नाही. मी तर मारणार नाहीच; पण तुम्हीसुद्धा कोणीही त्याला मारू नये. जग केवढं पुढं गेलंय. आपणही आपले रीतीरिवाज बदलायला हवेत. उगाचच कुणाला तरी मारणं हा गुन्हा आहे. फार तर जाऊन मी त्या मुलाचे कान उपटून येतो म्हणजे मग पुन्हा तो गावातल्या पोरींना छेडायचा नाही. आदम-आणि दुर्को यांच्या प्रेमाचे पोवाडे गातो आपण आणि त्या पोराला मारून टाकायचा? ते होता कामाचं नाही.'

बाप अन्वरच्या चेहऱ्याकडे बघतच राहिला. आपल्या पोराकडून त्याला ही अपेक्षा नव्हती. अत्यंत तिरस्कारानं तो म्हणाला, 'काफराचं अन्न खाऊन तू त्यांच्याच वळणावर गेलास शेवटी. काय केलं म्हणजे गुन्हा होतो आणि काय केलं म्हणजे इन्साफ होतो ते मला माहीत आहे, आपल्या सगळ्या खानखेलला माहीत आहे. तुलाही ते माहीत असायला हवं, की तू बुझदिल झाला आहेस ? अस्सल पुश्तूनवालीचं नाव लावतोस आणि आपल्या बहिणीची बेइज्जत करणाऱ्याला तू मारत नाहीस ? की तू त्याला मारल्यावर त्याचा बाप तुझ्या जिवावर उठेल म्हणून तू घाबरला आहेस ? पिढ्यान्-


पंतप्रधानपदाच्या
बेछूट गैरवापराची
वर्णन विलक्षण सत्यकथा

**" मारुती " कारस्थान**

लेखक—वि. स. वाळिंबे

दि. २ ऑक्टोबर ७९—गांधीजयंती रोजी
प्रसिद्ध होणार

डेमी आकार । पृष्ठे सुमारे २००
मूळ मूल्य रु. २०/—
२ नोव्हेंबर ७९ पर्यंत सवलतीचे मूल्य
फक्त रु. १५/—

**विश्वकर्मा साहित्यालय**

२०३५ सदाशिव पेठ,
टिळक पथ, पुणे ३०

पिढ्या आपली अशी वैरं चालतात, माहीत आहे ना तुला ? आणि तू मात्र–चालता हो माझ्यां नजरेसमोरून! माझा मुलगा म्हणवून घ्यायची लाज वाटते मला.' बापाला आशा होती. त्याच्या बोलण्यानं चिडून तरी तो त्या मुलाला मारेल !

पण अन्वरला काही त्या मुलाला गोळी घालणं जमत नव्हतं. एकदा उसन्या अवसानानं बंदूक घेऊन तो घराबाहेर पडला. त्या मुलाला शोधत खूप हिंडला, शेवटी गावाबाहेर खूप दूरवर एका घळीत, एका खडकाच्या आडोशाला बसलेला दिसला तो. घाबरलेला तर होताच. मृत्यू आपल्या मागावर असल्याची पूर्ण जाणीव असलेला. अन्वरला लग्नाअगोदर आपल्या बायकोबरोबर हिंडलं-फिरलेलं आठवलं. त्याच्या बंदूक धरलेल्या हाताला घाम सुटला. तो हळूच त्या पोराजवळ गेला. अन्वरला पाहून तो मुलगा केवढा तरी घाबरला, पळून जायचंही त्याला सुचलं नाही. जमिनीला खिळून उभा राहिला. अन्वर हळूच त्याला म्हणाला, 'तू पाकिस्तानात पळून का जात नाहीस ? तुमच्यासारखी किती तरी माणसं अशी पळून जातात, माहीत आहे ना तुला ? तुला तुझ्या बापानं, काकानं कुणी सांगितलं नाही का ?'

त्या मुलाच्या डोळ्यातल्या भीतीची जागा आता गोंधळलेपणानं घेतली. काहीसुद्धा कळत नसल्यासारखा त्याचा चेहरा झाला. अन्वरच्या खांद्यावरच्या बंदुकीकडे बघून त्यानं नजर फिरवली. काहीही न बोलता तो हळूहळू मागल्या पावली निघून जाऊ लागला; पण त्याच्या डोळ्यातले गोंधळलेले भाव जाऊन आता त्याची जागा शंका, संशयानं घेतली आणि शेवटी उपहासानं, तिरस्कारानं अन्वरकडे पाहून, शांतपणानं पाठ वळवून तो मुलगा हळूहळू निघून गेला. त्यानं एकदाही मागं वळून पाहिलं नाही. तरी पण त्याच्या डोळ्यातला उपहास, तिरस्कार अन्वरला विसरता येत नव्हता.

आठ दिवस होऊन गेले तरी तो मुलगा अजून जिवंत होता. गावातून उघडपणानं हिंडत होता. अन्वरकडे सुरुवातीला अपेक्षेने पहाणारी त्याची बहीण, त्याची आई आता त्याच्याकडे उपेक्षेनं पाहू लागल्या. गावातल्या लोकांच्या नजराही बदलल्या. अन्वरला सगळं असह्य होत होतं. तरी पण अजून त्याला त्या मुलाला गोळी घालवत नव्हती आणि जसजसे दिवस उलटत होते तसतसं त्याचं अवसान आणखीनच गळून पडत होतं. एकदोनदा त्यानं – आपल्या जुन्या दोस्तांना आपल्या मनातले विचार सांगायचा प्रयत्न केला; पण तेसुद्धा मान हलवून, न बोलता, काहीही ऐकून घ्यायला तयार नव्हते. अमेरिकेत सुखानं रहाणारा, उच्चविद्याभूषित, आधुनिक जगाशी जवळचं नातं असलेला पुश्तूनवाली टोळीचा महंमद खान-अन्वरखान, काहेजाद, आपल्याच गावात, आपल्याच घरात एकटा पडला.

शेवटी हा सगळा ताण असह्य होऊन त्यानं आपलं सामान आवरलं. घरातून निघाला. तेव्हा त्याचा बाप म्हणाला, 'तू निघून गेलास तरी इन्साफ व्हायचा रहायचा नाही. त्या मुलाला आता मी गोळी घालेन; पण आपल्या खानदानाला कालिमा फासलास तू ! खानदानाची इज्जत ठेवली नाहीस! जा तू आता; पण पुन्हा तोंड दाखवू नकोस.'

स्वतःच्या बापाच्या दुःखाची खंत मनात बाळगत, आपल्या मातीतून उपटून निघालेला अन्वर चार दिवसांनी अमेरिकेला जाणार होता, परत कधीही न येण्यासाठी!

**लेखांक सहावा : पुढील अंकी**




**लेखक : पु. ल. इनामदार । मूल्य : २० रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# पुस्तके

मिलिंद कोकजे

## यक्षांची देणगी

### माणसाला निर्मितीशील करणाऱ्या विज्ञानकथा

गाडगीळ, गोखले यांच्या नवकथेनंतर गेल्या काही वर्षांत इतर काही लेखकांनी काही नवीन फॉर्म्स वाचकांसमोर ठेवले. दिवाळी अंकांमधील धारपांच्या भयकथा, मतकरींच्या गूढकथा, जी. एं. च्या रूपककथा यांबरोबरच अगदी अलीकडच्या काळात लोक उत्साहाने वाट बघत असतात ती नारळीकरांच्या विज्ञानकथांची. 'कृष्णविवर' या पहिल्याच कथेने त्यांनी लोकांचं लक्ष वेधून घेतलं. 'यक्षांची देणगी' हा त्यांच्या बारा कथांचा संग्रह.

कालानुरूप पाहिलं असता नारळीकरांच्या कथांचे सामान्यतः दोन भाग पडतात. काही कथा या आज घडणाऱ्या आहेत तर काही फार फार वर्षांनंतरच्या. त्यातही मग अनेक उपविभाग आहेतच. 'कृष्णविवर'सारखी आज सुरू होणारी आणि उद्या संपणारी कथा, तर 'यक्षांची देणगी'सारखी स्वप्नात अतिशय सुरेख काल्पनिक उंची गाठणारी कथा, त्याचबरोबर आजच्याच जगातील परंतु मंगळावर घडलेली 'दृष्टीआड सृष्टी'-सारखी कथा.

'व्हायकिंग' मंगळावर जाऊन परत आले ते मनुष्यवस्तीबाबत नकारात्मक उत्तर घेऊनच. याच मूळ घटनेला अतिशय सुरेख जोड देऊन 'दृष्टीआड सृष्टी'चे लेखन नारळीकरांनी केले आहे. कथेत सांगितलेलं सत्य तावडतोब प्रश्न बनून आपल्यासमोर उभं रहातं, 'खरंच असं असेल का?' म्हणून आणि हेच या कथेचं यश आहे. केवळ याच नव्हे तर इतरही कथा वाचल्यानंतर नारळीकर असे अनेक प्रश्न आपल्या मनात निर्माण करतात. नारळीकर या कथांमधून केवळ प्रश्नच निर्माण करून थांबत नाहीत तर 'पुत्रवती भव' किंवा 'धूमकेतू' यांसारख्या कथांमधून सर्वसाधारण भारतीय लोकांची मनोवृत्ती व अंधश्रद्धा याविषयी लिहितात.

'गंगाधरपंतांचे पानिपत' ही अशीच अनेक प्रश्न आपल्या मनात उभी करणारी कथा. 'कॅटॅस्ट्रॉफी थिअरी' किंवा 'आकस्मिक विपत्तीचा सिद्धान्त' हा गेल्या दहा–बारा वर्षांत उदयाला आलेला गणिताचा भाग. प्रत्येक गोष्टीला साजेसे एक विश्व असून आपल्याला दर्शक ह्या नात्याने त्यातले एकच दिसते, ही क्वांटम थिअरीत प्रचलित असलेली कल्पना. याच कल्पनेवर आधारलेली कथा 'गंगाधरपंतांचे पानिपत.' अध्यक्षपद भूषविण्याची हौस असलेले प्रा. गंगाधर गायतोंडे एका लहानशा अपघाताने एका वेगळ्याच विश्वात जातात. इथे विश्वासराव पेशवे मार्ग आहे, पुण्याचे स्वतःचे मराठी कॅलेंडर आहे, चक्रवर्ती नावाचे कारचे मॉडेल आहे, व्यंकोजी नाईक नावाचा कोतवाल आहे, मराठा रेल्वे आणि जिजामाता एक्सप्रेसही आहे. असं हे अतिशय वेगळं जग आजच्याच काळातलं, त्यातली मुंबई, पुणे ही नावंही परिचयाची, तरीही वातावरण मात्र आपल्या जगापेक्षा संपूर्ण वेगळं. प्रा. गायतोंड्यांप्रमाणेच वाचता वाचता आपल्यालाही चक्रावून टाकणारं विश्व. मग एके ठिकाणी उत्तर मिळतं, पानिपतच्या युद्धात मराठे जिंकले असते तर हे असं झालं असतं. मराठे हरले ही एक बाजू, त्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत आपण जगतोय आणि त्याच वेळी, मराठे जिंकले ही दुसरी बाजू, त्यातून निर्माण झालेल्या परिस्थितीतही जगणारं एक जग या पृथ्वीवर आहे आणि ते वर उल्लेखिल्याप्रमाणे आहे.

'उजव्या सोंडेचा गणपती' ही अशीच एक चक्रावून टाकणारी कथा. जॉर्ज गॅमो याने मोबियस पट्टीसंबंधी मांडलेल्या थिअरीवर आधारलेली ही कथा. मोबियस पट्टीला असलेला पीळ तीन डायमेन्शनच्या अवकाशाला पडला तर त्यात आपल्यासारखे जीव चार डायमेन्शन्समधे फिरवले जाऊन बाजू बदलतात. मूल कणांमधे असलेल्या स्पिनमुळे अवकाशात पीळ निर्माण होऊ शकेल अशी गणितीय कल्पना ॲशर पेरेस यांनी मांडली. या कल्पनेचा या कथेत वापर केला आहे. एखाद्या वस्तूवर मूलकणांचा झोत टाकल्याबरोबर त्या वस्तूचं त्याच्या प्रतिबिंबात रूपांतर होतं, म्हणूनच डाव्या सोंडेचा गणपती उजव्या सोंडेचा होतो, प्रमोद रांगणेकर उजव्याऐवजी डाव्या हाताने गोलंदाजी करतो, संजू गोळेचं हृदय उजव्या बाजूला धडधडतं.

सामान्यांना चक्रावून टाकणाऱ्या या कथांबरोबरच 'यक्षांची देणगी,' 'ट्रॉयचा घोडा,' 'दृष्टीआड सृष्टी'सारख्या कथांमधील इतर ग्रहांवरच्या किंवा ग्रहमालिकांमधल्या मानवांनी किंवा 'अखेरचा पर्याय'मधील भविष्य काळातील याच पृथ्वीवरील मानवांनी स्वतःच निर्माण केलेल्या समस्या एका वेगळ्याच

भयानक धोक्याचे चित्र आपल्यापुढे उभे करतात.

कॉम्प्यूटर क्षेत्रात मानवाची प्रगती वाढत जाईल, इतकी की काही वर्षांनी, आपण दिलेल्या पर्यायांतूनच कॉम्प्यूटर निर्णय घेऊ शकतो हे मानव विसरेल आणि सूर्यापासून उर्जा निर्मिणारी सारी यंत्रणा कॉम्प्यूटरच्या ताब्यात देईल. या यंत्रणांमध्ये बिघाड झाल्यास दिलेल्या निवडक पर्यायातून कारण शोधून कॉम्प्यूटरच दुरुस्ती घडवून आणेल. दिलेल्या पर्यायात बिघाडाचे कारण नसेल तर इतर खंडाच्या कॉम्प्यूटरने हल्ला केला आहे हे समजून कॉम्प्यूटर स्वतःच निर्णय घेऊन इतर तिन्ही खंडाची उर्जायंत्रणा नष्ट करेल इतका व्यवस्थित 'प्रोग्रॅम' देऊनही गोंधळ होतोय. सूर्याच्या सोसर विंड (सौर वात) मध्ये वाढ होऊन उर्जायंत्रणेत बिघाड होतो. 'सोसर विंड' इतका वाढेल असा अंदाज नसल्याने व कॉम्प्यूटरला दिलेल्या पर्यायात हा पर्याय नसल्याने प्रत्येक कॉम्प्यूटर बंद पाडतील व उर्जानिर्मिती बंद झाल्याने सारं विश्व अंधारात बुडेल, हे 'अखेरचा पर्याय'चे सूत्र. अर्थात या धोक्यावर आजच्या काळातले काही प्रतिनिधी मात करतात व शेवटी मानवी मेंदूच श्रेष्ठ असल्याचे दाखवून देतात.

'अखेरचा पर्याय'मध्ये याच पृथ्वीवरील मानवाने निर्माण केलेल्या समस्यांचे वर्णन नारळीकरांनी केले आहे तर, 'ट्रॉयचा घोडा'-मध्ये इतर ग्रहमालिकांमधील मानव कसे धोकादायक ठरू शकतात ह्याचे चित्र रेखाटले आहे. ह्याच अनुषंगाने नारळीकरांनी मॅटर, अँटीमॅटर यांची माहिती दिली आहे.

केवळ याच कथेत नव्हे तर बहुतेक सर्वच कथांमध्ये नारळीकर सोप्या भाषेत सहजतेने अनेक शास्त्रीय गोष्टींची माहिती देतात. 'ब्लॅक होल्स' म्हणजे काय? काळ गोठतो म्हणजे काय? एक मायक्रॉन म्हणजे किती सें. मी.? 'मीटीओराइट' म्हणजे काय? 'जीन्स' आणि 'क्रोमोसोम' बालकाचे लिंग कसे ठरवतात? मॅटर, अँटीमीटर संयोगाने काय होऊ शकते? इ. अनेक शास्त्रीय प्रश्नांची माहिती नारळीकरांनी सर्वांना समजेल अशा सोप्या भाषेत दिली आहे.

असे असले तरीही त्यांच्या दोन कथांमधील विधानांबाबत मात्र माझ्या मनात प्रश्न उभे राहिले. 'धोंडू' कथेतील 'पृथ्वीच्या वातावरणाबाहेरील निर्मल सूर्यप्रकाशात...' हे वाक्य खटकते. कारण वातावरणाबाहेर अंधार आहे. तसंच 'गंगाधरपंताचे पानिपत'-मध्ये डॉक्टर त्यांच्या जगातील गायतोंड्यांबद्दल बोलताना सांगतात की, 'या गायतोंड्यांना पंधरा वर्षांपूर्वी मृत्यु आला.' या जगातील गायतोंडे यांनी मात्र दहा वर्षांपूर्वी इतिहासाची पुस्तकं लिहिलीत. जर एकाच काळातील ही दोन जगं आहेत तर त्यातील व्यक्तींच्या काळात असा फरक का?

'मला विज्ञानकथा का लिहावीशी वाटली?' या प्रश्नाचा उहापोह नारळीकरांनी या पुस्तकाच्या प्रस्तावनेत केला आहे. ते म्हणतात, 'विज्ञानाची गोळी जर कडू लागत असेल तर त्याला साखरेचे कोटिंग म्हणजेच कथेचे रूप देणे योग्य ठरेल. मी याच उद्देशाने कथा लिहिल्या आहेत.' मला वाटतं श्री. नारळीकरांनी प्रारंभीच योग्य उद्देश नक्की केल्याने त्यांनी या उद्देशाकडे यशस्वी वाटचाल केली आहे. प्रास्ताविकात इच्छा केल्याप्रमाणे इतरही वैज्ञानिक किंवा लेखक हा फॉर्म जास्तीत जास्त वापरून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवतील अशी आशा आहे.

वसंत सरवटे यांनी या पुस्तकाचे मुखपृष्ठ तयार केले आहे. वसंत सरवटे हे नाव चांगल्या मुखपृष्ठाशी नेहमीच निगडित आहे. सरवटे यांचे हेही मुखपृष्ठ नेहमीप्रमाणेच सुरेख, विषयाला चपखल असेच आहे. तसेच शीर्षकांबरोबर शास्त्रीय खुणा वापरण्याची कल्पनाही सुरेख. प्रकाशन मौजेचे असल्याने कागद, मुद्रण, मांडणी हे सर्वच उत्तम. चांगले पुस्तक देण्याची परंपरा मौजेने नेहमीप्रमाणेच राखली आहे.

शेवटी नारळीकरांनी आशा केल्याप्रमाणे मानवात रूढ असलेल्या अंधश्रद्धा, भ्रामक समजुती सोडून देण्यासाठी मानवात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजणे आवश्यक आहे. विज्ञानकथा हे कार्य करू शकतील. इतकेच नव्हे तर विज्ञानावर आधारलेल्या, ज्ञाताकडून अज्ञाताकडे झेपावणाऱ्या माणसाला निर्मितिशील करणाऱ्या या कथांचा हा संग्रह मराठी कथेत खरोखरच नवे समृद्ध दालन उघडील.

अतिशय साध्या, सोप्या भाषेत लिहिलेले, शास्त्रीय टर्मस् समजावून देणारे, विलक्षण कल्पनाशक्ती वापरून लिहिलेले आणि एका वेगळ्याच जगात घेऊन जाणारे हे आकर्षक पुस्तक खरोखर प्रत्येकाने वाचणे आवश्यक आहे, तरच नारळीकरांचा उद्देश खऱ्या अर्थाने सफल होईल. *

**यक्षांची देणगी**
डॉ. जयंत नारळीकर
मौज प्रकाशन गृह, मुंबई
पृष्ठे : २३७
मूल्य : रु. २१.

# 'फिनिक्स' निवड

## Evrything you wanted to know about Nutrition

By– David Reuben, M. D.

'अंडी खाण्यानं कॉलेस्टेरोल वाढतो.'

'अहो, तसं नसतं. सर्वांत पौष्टिक आहार म्हणजे अंडी! व्हिटॅमिन्स, मिनरल्स, ट्रेस एलिमेंटस्, आणखीन् काय हवंय?'

'अहो, अंडी पौष्टिक असतात; पण उन्हाळ्यात ती खाऊ नयेत!'

'आणि कॉफी कधीच घेऊ नका बरं का! कॉफीमुळे हार्ट अॅटॅक, अल्सर व इतर व्याधी होतात. होमिओपाथिकवाले सुद्धा कॉफीच्या नावाने बोंबलतात.'

'छे, आपली माहिती साफ चुकीची आहे. कॉफीमुळे CNS (Central Nervous System) उत्तेजित होते. तुमची एकाग्रता वाढते. पचनक्रिया सुधारते. तुम्हाला एक जलद पिक–मी–अप् हवे असेल तर गरमागरम कॉफीसारखी दुसरी चीज नाही!'

आहे ते आरोग्य राखण्यासाठी व आणखीन आरोग्य मिळविण्यासाठी माणूस सारखा धडपडत असतो. यात अर्थात पौष्टिक आहार कोणता याला फार महत्त्व असते. आपल्या पौष्टिक आहाराच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी आपण सारखे प्रयत्न करत असतो. वर्तमानपत्रात किंवा नियतकालिकांत

आहाराबद्दलच्या मथळ्याखालच्या मजकुराने आपले डोळे सरसावतात. सुरुवातीला आहाराबद्दलचे आपले ज्ञान वृद्धिंगत झाले असेही आपल्याला वाटते; पण जेव्हा त्याच नियतकलिकात त्याच आहाराबद्दल वरील संभाषणासारख्या उलटसुलट बातम्या यायला लागतात तेव्हा मात्र आपण भांबावून जातो, चिडतो व शेवटी आपल्या जिभेला जे रुचेल तेच खायला लागतो ! मला वाटते हाच सर्वांत औचित्यपूर्ण मार्ग आहे. प्रत्येकाच्या शरीराची जडण–घडण विशिष्ट केमिकलसनी व पेशींनी झालेली असते. आपल्या शरीराला जे हवं असतं त्याचेच डोहाळे आपल्याला लागतात. काहींना आंबट हवं असतं ते त्यांनी खुशाल खावं ! (अर्थात् टोकाला न जाता). थोडक्यात शरीराला हवं असतं तेच आपल्याला रुचतं, आणि पचतं.

हा जरी सर्वांत सोपा मार्ग असला तरी पौष्टिक आहाराविषयी अज्ञान मात्र असू नये. इतर अनेक बाबींसारखी खाणं ही एक सवय आहे. म्हणजे काय खाणं ही सवय आपल्याला लहानपणापासूनच जडत असते. योग्य माहितीने व प्रयोगाने यात जरूर बदल करता येतील; परंतु सर्वांत विश्वासार्ह मार्गदर्शन करणारे म्हणजे स्वतःचे instinct.

या पुस्तकाचे नाव डॉ. रुबेनने दुसरे काही ठवायला हवे होते. कारण त्यांनी याआधी एक सेक्सवर फारच मजेदार पुस्तक लिहिले आहे. त्याचे नाव आहे Everything you always wanted to know about Sex. (But were afraid to ask ही लाइन अगदी बारीक टाइपमधे पुस्तकाच्या खालच्या बाजूला.) ते फारच लोकप्रिय झाल्यामुळे त्याचे नांव जिभेवर इतके रुळले आहे की प्रत्येक वेळेला Nutrition च्या ऐवजी 'Sex' हाच शब्द जिभेवर येणार ! डॉ. रुबेनची ही दोन्ही पुस्तके प्रश्नोत्तररूपाने आहेत. दोन्ही पुस्तकात प्रश्न व उत्तरे मुद्देसूद व सरळसोट असल्यामुळे एखाद्या मुलाखती-सारखी ती रंगली आहेत.

यू. एस्. ए. हा देश सर्वांत जास्त चरबी-युक्त पदार्थ खातो. अर्थात् त्यामुळे तेथे हृदयरोग फार होतात. आपल्या शरीराला चरबीची आवश्यकता फारच कमी असते. चरबीमध्ये पण भरपूर प्रकार असतात. सेच्युरेटस, पॉली अनसेच्युरेटस्, कॉलेस्टेरोल वगैरे. चरबीचे दोन घटक असतात. ग्लिसरिन व चरबीयुक्त ॲसिडस्. प्रत्येक प्रकारच्या चरबीमध्ये ग्लिसरिन हा घटक तसाच अबाधित असतो; परंतु चरबीचे प्रकार मात्र वेगवेगळ्या पदार्थांमध्ये वेगवेगळे असतात. उदाहरणार्थ बीफमध्ये व ऑलिव्ह ऑइलमध्ये वेगवेगळे फॅटी ॲसिड असते.

कॉलेस्टेरोल ही एक प्रकारची चरबी असते. तुमच्या आहारातूनच तुम्ही कॉलेस्टे-रोल घेता, कॉलेस्टेरोलमुळे हृदयरोग होतात व संतुलित आहारात कॉलेस्टेरोल नसतो ही सर्व विधाने चुकीची आहेत. मग कॉलेस्टेरोल-विषयी सत्य माहिती आहे तरी काय ? कॉलेस्टेरोल ही चरबी नसते, पण तो एक ग्लिसरिनसारखा अल्कोहोल असतो. तुमच्या शरीरातच तुम्ही खाता त्यापासून होणाऱ्या कॉलेस्टेरोलपेक्षा तिप्पट कॉलेस्टेरोल निर्माण होतो. जवळजवळ ८०% हार्ट पेशन्टस्च्या रक्तात कॉलेस्टेरोल नॉर्मल असतो. कॉलेस्टे-रोल हा शरीराच्या चयापचय क्रियेला आवश्यक असतो. तुम्ही जर तो आहारात घेतला नाही तर तुमचे शरीर त्याची निर्मिती करील. शरीराच्या सर्व टिशूमध्ये कॅलेस्टेरोल असतो. कुणी लो कॉलेस्टेरोल आहारावर असेल तर त्याच्याच शरीरातील प्रथिने, carbohydrates व चरबी यापासून भराभर कॉलेस्टेरोल निर्माण होतो. डॉ. रुबेन परत परत व उघड उघड असे म्हणतात की, कॉलेस्टेरोलमुळे हृदयरोग होत नाही. त्यांचा हा दृष्टीकोन धक्कादायक वाटतो. त्यांच्या या विचाराने 'सफोला' सारख्या पॉलीअन-सेच्युरेटेड करडईच्या खाद्यतेलावर परिणाम होईल का ? अमेरिकेतील फेडरल ट्रेड कमिशन तर चक्क कुणालाही पॉलीअनसे-च्युरेटेड फॅटस्‌मुळे हृदयरोग होत नाही असा दावा जाहिरातीत करू देत नाही. So Saffola is not Kind to the heart, after all. And it is unkind on your purse ! Unkind–hearted Cooking medium !

कॉलेस्टेरोलचा बाऊ पहिल्यांदा १९११ मध्ये रशियात निर्माण झाला. ( या इझमच्या वादामुळे तर डॉ. रुबेन कॉलेस्टेरोलवर तुटून पडले नाही ना ? )

हृदयरोग होण्याची कैक कारणे असतात, असे मी अनेक वेळा वाचले आहे. हृदयरोग हा अनुवंशिकतेमुळे, ॲलर्जीमुळे, इलेक्ट्रिकल इंपल्स फेल्युअरमुळे, ब्लडप्रेशरमुळे, मानसिक तणाव, दबावामुळे, धकाधकीच्या जीवनामुळे, वजन वाढल्यामुळे, कमी व्यायामामुळे, अति व्यायामामुळे, कांदा–लसुणीच्या अभावामुळे, डायबेटिसमुळे होतो; पण या जगात एका झटक्यात (massive heart attack) जो हृदयरोगी दगावतो तोच खरा भाग्यवान ! ३–६ झटक्यात जो जातो त्याची व त्याच्या कुटुंबियांची वाताहात. ( परंतु डॉक्टरांची पर्वणी ! )

सी व्हिटॅमिन पुरस्कर्ते ( Dr. Linus Pauling ) तर असे सांगतात की, या व्हिटॅमिनमुळे कॉलेस्टेरोलचे जठरात बाइल-मध्ये रूपांतर होते व त्यामुळे हृदयरोग टाळले जातात. योगासनवाले म्हणतात, त्यांच्या अनुनयाने ब्लडप्रेशर व हृदयरोग होत नाहीत ! मला वाटते सर्वांत रामबाण उपाय म्हणजे रोज ध्यान धरणे की, या महागाईत एका झटक्यात मी हृदयरोगात खलास व्हावे. (म्हणजे तो तुम्हाला कधीच येणार नाही !) खोटं सांगत नाही. करून बघा प्रयोग !

आता या रुबेनला काय सांगावं ? या पुस्तकात ते म्हणतात की, सफरचंदाच्या साली तर तुम्ही खाच; पण त्यातील बी आणि core ही तुम्ही खाऊन टाका ! ( मी असे कधीच करणार नाही, कोणत्याही आहार-तज्ज्ञाने सांगितलं तरी ! ) नैसर्गिकरीत्या तुम्हाला जी फळे व भाज्या मिळतात ती तशीच खाल्ली तर पुष्कळ आरोग्यसंपन्न व्हाल असे रुबेन व इतर आहारतज्ज्ञ म्हणतात.

डॉ. रुबेनचं एक आवडतं खाणं म्हणजे कोंबडीचं फळ. वारंवार ते आपल्याला सल्ला देतात की, अंड्यासारखा पौष्टिक खुराक नाही. शेवटी आहार ही अशी चीज आहे की, त्यात फेडस् असणारच आणि आहारतज्ज्ञ आहार घेतातच. त्यामुळे तेही फॅडिस्टच ! आपल्या भारतात मात्र चरणसिंगांच्या बजेट-नंतर आहाराच्या बाबतीत चखल्या ठेवून चालणार नाही. नं. २ वाले सोडून ज्यांची पोटाची खळगी भरली ते नशीबवान !

हे पुस्तक वाचून मी वाटेत चार सफरचंदं विकत घेतली व त्यातील एक सोलून बी व core काढून आमच्या बाल्कनीखाली एक शेळी येते...तिला खायला दिले, 'खा ग तू व्हिटॅमिन. मला निष्कृष्ट अन्न चालेल !' ती माझ्याकडे कृतज्ञतेने बघू लागली. मी सुद्धा एक चांगले काम केल्याने कृतकृतार्थ होऊन तिच्याकडे पाहिले.

—जे. एन्. पोंडा

रंगभूमी

## 'भरत'ची स्वस्त नाटक योजना

नाटक या प्रकारात कितीही रस असला तरी हल्लीचे नाटकांचे दर पाहता हा रस मनसोक्त पिणे जरा कठीणच असते. यावर तोडगा म्हणून भरत नाट्य मंदिराने दोन वर्षांपूर्वी म्हणजे १९७७ पासून स्वस्त दरात नाटके सादर करण्याची योजना आखली. या योजनेसाठी सभासद नोंदले आणि पहिल्या वर्षी तीनशे सभासदांना म्युनिसिपालिटी, कट्यार काळजात घुसली, वाजे पाऊल आपुले ही तीन नाटके आणि दोन एकांकिका दाखविण्यात आल्या. दुसऱ्या वर्षी सरी ग सरी, वऱ्हाडी माणसं, दुरितांचे तिमिर जावो आणि स्वरसम्राज्ञी ही नाटके सादर करण्यात आली. या वर्षीच्या कार्यक्रमामधील पहिले नाटक 'तुझे आहे तुजपाशी' नुकतेच भरततर्फे सादर करण्यात आले.

पद्मश्री पु. ल. देशपांड्यांचे हे सदाबहार नाटक दिग्दर्शित केले होते श्री. विनायक गोडसे यांनी. खुमासदार संहिता आणि कलाकारांचा अभिनय यामुळे नाटक चांगलेच रंगले.

या सर्व योजनेत एक संगीत नाटक आणि वेगवेगळ्या विषयांवरील तीन गद्य नाटके अशी निवड करून भरतने विविधता राखली आहे. याशिवाय अनेक नव्या कलाकारांना या वर्षभर चालू असणाऱ्या उपक्रमातून वाव मिळतो. या सगळ्याचा परिणाम म्हणजेच भरतच्या या योजनेला मिळत असलेला प्रेक्षकांचा वाढता प्रतिसाद. या वर्षीची सभासद संख्या ५५० आहे.

भरतने या वर्षीपासून सुरू केलेला आणखी एक उपक्रम म्हणजे 'कै. वसुमती विजापुरे एकपात्री अभिनय स्पर्धा.' भरततर्फे ऑक्टोबरच्या दुसऱ्या वा तिसऱ्या आठवड्यात ही स्पर्धा घेण्यात येणार आहे. आत्मगते, एकपात्री दर्शनासाठी स्वतंत्र लेखन, भूमिकादर्शन, एकपात्री प्रवेश इत्यादी प्रकारांनी हे एकपात्री अभिनयदर्शन अपेक्षित आहे. □

# चित्रपट

## काला पत्थर

चित्रपटाची कथा सलीम-जावेद आणि कलाकारांमध्ये अमिताभ बच्चन म्हटल्यानंतर चित्रपटात अमिताभचे नाव विजय असणार येथपासून पुढील सगळ्या गोष्टी ओळखता येतात. तरीही मी 'काला पत्थर' बघण्याचे ठरविले. त्याचे एकमेव कारण म्हणजे त्याचा वेगळा विषय. एका कोळशाच्या खाणीत पाण्याच्या पुराखाली अडकलेले चारशे मजूर आणि त्यांना वाचविण्यासाठी जिवाची शर्थ करणारे काही जण. विदेशी चित्रपटांमध्ये अशा चित्रपटांची एक मालिकाच निर्माण झाली. 'पोसायडन अॅडव्हेंचर', त्यापाठोपाठ आलेला 'द टॉवरिंग इन्फर्नो', आता सध्या पुण्यात चालू असलेला 'द बुलेट ट्रेन' किंवा सध्या निर्मितीअवस्थेत असलेला 'द अर्थक्वेक'. कदाचित ही मालिका अजूनही लांबेल. असे एखादे संकट आणि त्यातून घडणारी वा न घडणारी सुटका हा विषय तसा नवीन नाही. विदेशी चित्रपटांमध्ये विशेषतः युद्ध, हेरगिरी वा गुन्हेगारी चित्रपटांकडे नजर टाकली किंवा हिंदी चित्रपटांमधील कोणत्याही नायकाच्या आयुष्याचा विचार केला, तर त्याला अशा अनेक संकटांच्या अनेक मालिका पार कराव्या लागतात. म्हणूनच अशा आपत्तीचा विषय नवीन नव्हता; तर प्रकार नवीन होता. समुद्रात वादळात उलटलेले जहाज, अतिशय उंच (बहुधा एकशेपस्तीस मजली) इमारतीला लागलेली आग अशी भीषण संकटे, त्यातून सुटका करून घेण्यासाठी धडपडणारे असंख्य जीव आणि त्यातून दिसणारे, पटणारे, भिडणारे मानवी स्वभावाचे विविध पैलू आणि या सगळ्याला वाहिलेला संपूर्ण चित्रपट– पोसायडन अॅडव्हेंचर वा द टॉवरिंग इन्फर्नोचा विचार केल्यास थोडीशी पार्श्वभूमी तयार करण्यापुरती सुरुवातीची दहा-बारा मिनिटे गेल्यानंतर सुरू होतो. जिवावर बेतलेला एक विध्वंस, त्याची कमीजास्त होणारी तीव्रता, जीवन-मृत्यूच्या टोकांमध्ये हिंदकळणाऱ्या त्या भीषण लंबकाला लोंबकळणारी, लटकणारी काही अस्तित्वे आणि एक धडपड, प्रचंड धडपड– ते आयुष्याचे टोक पकडण्यासाठी.

ही सगळी पार्श्वभूमी असताना हिंदीवालेही याच समांतर रेषांवर चित्रपट काढण्यासाठी पुढे सरसावले. त्यापैकीच 'आसमान की बुलंदियोंपर लिखा जानेवाला' वगैरे ठेवणीतील चकचकीत कुबड्यांवर विसावून पहिला चित्रपट सादर झाला– 'काला पत्थर' आणि म्हणूनच उत्सुकतेने बघायला गेलो.

चित्रपट सुरू झाला.

एक कोळशाची खाण. तिच्या बाजूलाच असलेली मजुरांची वसाहत. शिफ्ट बदलण्याचा भोंगा वाजतोय. मजूर कामावर निघाले आहेत. कामावरून काही जण घराकडे. त्यातच एक अमिताभ– थकलेला, भागलेला, दमलेला. (लगेच मनात आले– याला 'टोनस–7'ची गरज आहे.) तर तो खोलीत येतो, धाडदिशी बिछान्यावर अंग टाकतो. त्याला एक स्वप्न दिसायला लागते– नौदल अधिकाऱ्याच्या पोषाखात अमिताभ, भोवती प्रचंड कोलाहल करणारी गर्दी. (आठवा, 'जंजीर'मधील स्वप्न– अमिताभ

आणि पांढरा घोडा) अचानक अमिताभ जागा होतो— विलक्षण अस्वस्थ. बाहेर आरडाओरडा चालू आहे, लोक खाणीच्या दिशेने पळत आहेत. अमिताभही पळतो. 'काय झालं ?' 'खाणीचा एक भाग खचलाय, सुधाकर आत अडकलाय.' अमिताभ लगेच आत शिरतो.

इतका वेळ झाल्यानंतर मी खूपच झालो. हिंदीवाल्यांना ही उपरती कशी सुचली ? इतक्या झटकन विषयाला हात ? वा, शाबास दिग्दर्शक यश चोपडा! पुढे पहायला लागलो.

अमिताभ खाणीत, खचलेल्या भागात. एका दगडापलीकडून सुधाकरचे कण्हणे. अमिताभ दगड फोडतो. लगेच सुधाकरला घेऊन बाहेर. जमावाच्या आरोळ्या—'विजयभय्या की जय !'

मी खचलो. हा विषयला हात—बीत नसून सुरवातीलाच हिरोत्व सिद्ध करणे होते आणि नंतर संपूर्ण चित्रपटभर खचतच राहिलो. खाणीत अडकलेले मजूर आणि त्यांची सुटका या 'वेगळा विषय' नावाच्या क्षुद्र, क्षुल्लक प्राण्याला शेवटची वीस मिनिटे उदार अंतःकरणानं वहाल करून उरलेल्या सुमारे अडीच तासात सलीम—जावेदनी जंजीर, शोले, त्रिशूल, दीवार इत्यादी चित्रपटांमधील दृश्ये पुन्हा दाखवली. सगळ्यांमधील अमिताभ ऊर्फ विजय हा समाईक भाग कायम ठेवून बाकी सर्व पात्रे आणि संवादांमधील अर्थ कायम ठेवून शब्द बदललेले. चित्रपटात मग आणखी गाणी आहेत, नाच आहेत, मारामाऱ्यासुद्धा आहेत— फक्त या सगळ्यांच्या जागा बदलल्या आहेत, मुंबईत हे सगळे घडण्याऐवजी कोळशाच्या खाणीत किंवा खाणीजवळ घडते. हिंदी चित्रपटातील मारामाऱ्या आणि त्यात दिसून येणारी हिरोची (विशेषतः अमिताभची) जिगर कोणत्या मर्यादेपर्यंत पोहोचणार आहेत कोण जाणे. 'काला पत्थर' मधील एक उदाहरण सांगतो. धन्ना नावाचा गुंड हातात एक चांगला भलादांडगा सुरा घेऊन अमिताभसमोर येतो. अमिताभने त्याला ठोकणे हे मी पूर्णानुभवावरून गृहीत धरले होते; पण या ठिकाणी वेगळीच जादू दिसली. अमिताभने पाहता पाहता तो सुरा धारेच्या बाजूने धरला, धन्नाच्या हातातून तो पिळवटून फेकून दिला आणि आपल्या हातातून रक्ताची धार लागली असताना धन्नाकडे एक तुच्छ नजर टाकून तो चालू लागला ! या प्रकाराला आपण पडद्यावर हिरोगिरी नाव देत असतो तरी प्रत्यक्षात असे पाहिल्यास राक्षसीपणा वा अमानवीपणा असे काही तरी म्हटले असते. या मारामाऱ्या, त्यात लोकांना होणाऱ्या किंवा न होणाऱ्या जखमा आणि जर जखमा झाल्या तर त्यांचे भरून येणे हा वैद्यकीय क्षेत्रातील लोकांसाठी खास अभ्यासाचा विषय आहे. लोखंडी फावडे मारल्यानंतरसुद्धा ज्यांना काहीही होत नाही अशांची कातडी गेंड्याची म्हणावी की त्या फावड्याचे लोखंड भेसळयुक्त म्हणावे ? (हे दोन्ही न म्हणता अशा लोकांना हिरो म्हणावे !)

'काला पत्थर' मधील पाहता पाहता संध्याकाळची, दुपारची, सकाळची अशा स्थित्यंतरांमधून जाणाऱ्या सावल्या (पहा— 'एक रास्ता है जिंदगी' हे पडद्यावरील शशिकपूरचे गीत व त्याच्या त्या वेळच्या सावल्या) आणि पटापट वाढणाऱ्या वा कमी होणाऱ्या खुरट्या दाढ्या या गोष्टींमुळे चित्रपटातील प्रसंग आणि दोन प्रसंगांमध्ये गेलेला काळ यांचा परस्परांचा सुसंबद्ध संबंध लावण्याचा प्रयत्नच मी सोडून दिला. तोच प्रकार चित्रपटातील खाणीतील कोळशाच्या बाबतीत. चौपाटीवरची वाळू ज्याप्रमाणे अंगाला वा कपड्याला चिकटत नाही त्याप्रमाणे या कोळशाची खर, काळेपणा हा काही जणांच्याच अंगाला वा कपड्याला चिकटत नाही. उदाहरणार्थ—परवीन बाबीच्या अंगाला व कपड्याला कधीच, कुठेच हा कृष्णकलंक लागला नाही. चित्रपटाच्या शेवटी तर—अमिताभचे सर्वांग कोळशाने काळे झालेले, चिखलाने माखलेले; पण अशा अवस्थेत त्याने इफ्तेकारला (इफ्तेकार कडक सुटात) मिठी मारल्यानंतरही इफ्तेकारच्या सुटावर टाचणीच्या टोकाएवढासुद्धा डाग दिसत नाही.

चित्रपटाचे प्रमुख आकर्षण खाणीत शिरलेले पाणी, अडकलेले मजूर, त्यांची सुटका इत्यादी—लांबीने आधीच कमी असलेला हा भाग त्यातील काही क्षण सोडल्यास अत्यंत तकलादू आणि उथळ.


मला आवडलेला चित्रपटातील एकमेव भाग म्हणजे राणा (मॅक्मोहन) आणि विजय (अमिताभ) या व्यक्तिरेखा. रा. हा अट्टल पत्तेबाज ! आयुष्यात कधीच, केव्हाच हा माणूस पत्त्यांमध्ये हरलेला नाही; पण खाणीत अडकलेल्या पांच जणांपैकी कोणत्या चौघांनी बाहेर पडायचे, हे पत्त्यावरून ठरविताना मात्र राणाच्या वाट्याला सर्वांत हलके पान— 'दुग्गी' येते. पाण्याच्या प्रचंड लोंढ्याबरोबर राणा आणि दुग्गी तरंगत वाहात जातात.

विजय ही खास अमिताभसाठीच रचलेली व्यक्तिरेखा. वरून शांत, अबोल; पण आतून एखाद्या तप्त, जागृत ज्वालामुखीप्रमाणे खदखदणारा, धुमसणारा विजय; आयुष्यात एकदाच घडलेल्या चुकीसाठी सतत स्वतःला जाळत राहणारा विजय त्याच्या अन्य 'विजय' प्रमाणे नाही. अतिशय कमी शब्दांमध्ये, काही ठिकाणीं तर अजिबात शब्द न वापरता आपल्या जळत्या डोळ्यांनी अमिताभने कित्येक प्रसंग खाल्ले आहेत. (विशेषतः शत्रुघ्न सिन्हासरोबरचे प्रसंग आणि त्यात राहणारा अमिताभचा वरचष्मा हा बराचसा कथेमुळे असला तरी त्यात अमिताभचा वाटाही मजबूत.)

चित्रपटात संगीत (पार्श्वसंगीत नव्हे) हा प्रकारच केवळ धंदा व नाच—गाण्यांची रेलचेल म्हणून टाकायचा म्हटल्यानंतर त्यांच्या बरेवाईटपणाचा प्रश्नच उरत नाही. गीतकार साहिर व संगीतकार राजेश रोशन.

वेगळा विषय हा बुरख्याआड आणखी एक मालमसालायुक्त धंदेवाईक चित्रपट म्हणजे 'काला पत्थर!'

**—सदानंद बोरसे**



# चित्रपटाबाहेर....

आपल्याकडे कोणत्याही नट–नटीने वयाची चाळिशी उलटली की ते हळू हळू काळाच्या पडद्याआड अदृश्य होऊ लागतात. अपवाद फक्त देव आनंद, अशोक कुमार तमाम चरित्र अभिनेते / नेत्र्या. पण हॉलिवुडमध्ये मात्र परिस्थिती एकदम वेगळी आहे. जॉर्ज बर्न्स हा अभिनेता सध्या त्या ठिकाणीं लोकप्रियतेच्या शिखरावर असून केवळ या लोकप्रियतेच्या जोरावर ‘ Oh, God ’ या त्याच्या चित्रपटाचा ‘ Oh, God ! Part II ’ नुकताच प्रदर्शित करण्यात आला आहे. आणखीही कितीतरी चित्रपट बर्न्ससाहेबांच्या हातात आहेत आणि आता त्यांचं वय आहे अवघं चौऱ्याऐंशी वर्ष !

❋

मध्यंतरी एक अगदी वेगळाच पाहुणा राजकपूरला भेटायला आला होता. उत्तर प्रदेशात बूट पॉलीश करून गुजराण करणारा हा तरुण. पण राजकपूरला भेटायची त्याची फार इच्छा होती. राजकपूरला तो भेटला. त्याला काही खास उत्तर प्रदेशी भेटी त्याने दिल्या आणि निरोप घेताना राजकपूरला तो म्हणाला, ‘ सत्यं, शिवं, सुंदरम् ’ ची पोस्टर्स मी माझ्या दुकानावर लावली आणि रोज जवळजवळ २ रु. अधिक धंदा होऊ लागला आहे !

*

आजारी पडल्यावर जो सक्त विश्रांतीचा काळ असतो त्या काळात काय करायचं हा प्रश्न इतर सामान्याप्रमाणेच विनोद मेहरालाही नुकताच पडला होता. बीच कँडी हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन करण्यात आल्यावर त्याला सुमारे पंधरा दिवस ‘ सन अँन्ड सँड ’ या हॉटेलात राहावे लागले. या पंधरा दिवसांच्या काळात विनोदने एकूण बावीस फिल्म पाहिल्या ! नाहीतरी कामामध्ये बदल म्हणजेच विश्रांती नाही का ?

*

फिल्म इंडस्ट्रीमध्ये कित्येकांचे विवाह हा चर्चेचा विषय बनतात, तर कित्येकांच्या अविवाहितपणाची कारणं शोधण्यातही अनेकजण गर्क असतात. प्रसिद्ध अभिनेता संजीवकुमारला या बाबतीत विचारलं असता तो म्हणाला,

‘ मला केवळ लग्नासाठी लग्न करायचं नाही. मूळात मला एकटंच राह्यची सवय अधिक आहे आणि इतकी वर्षं एकटं राह्यल्यानंतर आता त्याचं काही वाटतही नाही. तरी देखील मी लग्न करण्याची शक्यता संपूर्णपणे नष्टही झालेली नाही. मी अतिशय संवेदनाशील माणूस आहे. त्यामुळे मी जर एखाद्या मला अनुरूप नसलेल्या मुलीशी लग्न केलं तर त्याचा मला जास्त त्रास होईल. ज्या माणसाबरोबर आपल्याला संपूर्ण आयुष्य घालवायचं आहे, त्याचा आधीच परिचय होणे किंवा असणं मला आवश्यक वाटतं. ’

स्वतःच्या फिल्म इंडस्ट्रीतील कारकीर्दीबद्दल संजीव म्हणतो–

‘ वयाच्या पंधराव्या वर्षापासूनच मला या क्षेत्राची अतिशय ओढ लागली होती. मी ‘ फिल्मालय स्कूल ऑफ ॲक्टिंग ’ या संस्थेमध्ये शिकायला जाऊ लागलो. त्यावेळी ‘ हम हिंदुस्थानी ’ हा चित्रपट तयार होत होता. त्यातील पोलीस इन्स्पेक्टरच्या रोलसाठी दिग्दर्शकाला कुणाची तरी गरज होती. इन्स्पेक्टरसाठी शिवण्यात आलेले कपडे माझ्या अंगावर व्यवस्थित बसले आणि माझी त्या रोलसाठी निवड करण्यात आली. संजीवने ते काम व्यवस्थितपणे केलं. त्याबद्दल त्याला बिदागीही देण्यात आली. बिदागीची रक्कम होती रु. ३५।– पण इथून संजीवकुमारच्या कारकीर्दीला जी सुरवात झाली ती सतत चढतीच राहिली.

*

फिल्म इंडस्ट्रीमध्ये देव–धर्म–अध्यात्म या विषयांवरही काही वेळा चर्चा होतात. नाही नाही म्हणत असतानाच कित्येक नटनट्या विविध गोष्टी करत असतात, विनोद खन्नाची रजनीश-भक्ती हाही एक फिल्म इंडस्ट्रीत वारंवार चर्चिला जाणारा विषय आहे. त्यावर विनोद खन्ना स्वतःच म्हणतो–

‘ सुमारे पाच वर्षापूर्वी माझी आई, माझी तरुण चुलत बहीण आणि माझे काका हे तिघेजण अगदी थोड्या थोड्या अंतराने मरण पावले. त्याचवेळी ‘ आपण असं मरायचं नाही ’ असा निश्चय मी स्वतःशीच केला; पण थोड्याच काळात त्यातला फोलपणाही माझ्या लक्षात आला. कारण मृत्यूबाबत तुम्ही काहीही ठरवू शकत नाही.

माझ्या स्वतःच्या जीवनात किमान चार वेळा तरी असे प्रसंग घडले की, ज्यावेळी आपण आता मरणार, अशी भावना तीव्रतेने माझ्या मनात उपटली. मृत्यूचं मी अतिशय जवळून घेतलेलं ते दर्शन होतं. मी अतिशय अस्वस्थ झालो. मला काहीही सुचेना. मनाच्या या दोलायमान अवस्थेत असतानाच मी भगवान रजनीशांकडे खेचला गेलो. जीवन आणि मृत्यूबद्दल माझ्या मनात असंख्य प्रश्न होते आणि मला त्यांची उत्तरं हवी होती. भगवान रजनीशांच्या ठिकाणी मला असं जाणवलं की, तुम्ही कोणत्या अनुभवातून जात आहात हे ओळखण्याची ताकद या माणसाच्या ठिकाणी आहे. बरीच माणसं निर्वाणाप्रत जात असतील; पण निर्वाण प्राप्त कसं करून घ्यायचं, हे फारच थोडे शिकवू शकतात. भगवान रजनीश या थोड्यांपैकी एक आहेत. आपल्या प्रत्येक कृतीला आपण स्वतःच जबाबदार असतो, हे मी भगवानांकडूनच शिकलो. माझ्या हातात सध्या सुमारे १५ फिल्मस आहेत. त्या पूर्ण केल्यानंतर चित्रपट संन्यास घेण्याचा माझा विचार आहे. मला पुष्कळ प्रवास करायचाय, पुण्याला भगवानांच्या आश्रमात जाऊन राह्यचंय. कृष्ण, बुद्ध, शिव, जीझस आणि मोहम्मद ही सर्व रूपं भगवतांच्या ठिकाणी एकत्र झाली आहेत.



लोकांनी इंदिरा गांधीकडे 'गुन्हेगार' म्हणून पाहावे, त्यांना 'अस्पृश्य' ठरवावे अशीही अपेक्षा बाळगायची यात केवळ विसंगती, अनैतिकता आहे, एवढेच नव्हे तर हा चक्क राजकीय भ्रष्टाचारच आहे. हा आणि अशा प्रकारचा राजकीय भ्रष्टाचार सर्वच पक्षात माजलेला असल्यानेच इंदिरा गांधी आजवर शिक्षा न होता सुरक्षित राहिलेल्या आहेत. इंदिरा गांधींनी आणीबाणीचे पाप निश्चित केलेले आहे; पण या पापाबद्दल त्यांना, सत्ता–संपत्तीवर तुळशीपत्र ठेवून कठोर प्रायश्चित्त फर्माविणारा एक तरी रामशास्त्री आज दिल्लीत अस्तित्वात आहे का? इथेच नेमकी गोम आहे. पाणी इथेच मुरते आहे. आपल्याला राजकारणातून उठवू पाहणाऱ्या बहुसंख्य विरोधकांचे शेणामेणाचे पाय इंदिरा गांधींनी जोखलेले आहेत. यांची बकबक बंद करायला सत्तेचा एखादा शिळा तुकडाही पुरेसा असतो याची त्यांना अनुभवाने खात्री पटलेली आहे. म्हणून त्या आकाश कोसळले आणि जमीन दुभंगली तरी अजून ताठ उभ्याच आहेत आणि हे लाचार विरोधक पूर्वी आणि आताही मेलेले ते मेलेलेच राहिलेले आहेत! यांनी काय गोष्टी कराव्यात इंदिरा गांधींना त्यांच्या पापांबद्दल, गुन्ह्याबद्दल कठोर शिक्षा करण्याच्या? तो नैतिक अधिकार, ते राजकीय धैर्य यापैकी एकाजवळही नाही! आता लोकांना जे योग्य वाटेल ते लोक करतील. पुढाऱ्यांकडून नैतिकतेचे, लोकशाही मूल्यांचे, न्याय–अन्यायाचे पाठ ऐकण्याची लोकांची इच्छाच नाही! दोन्ही बाजूंना सत्तापिपासा आणि भ्रष्टाचार असेल आणि तो आहेच, तर लोक धडाडीच्या आणि तडफदार व्यक्तीची– पक्षाची सत्तापिपासा– भ्रष्टाचार पसंत करतील, हे ओळखायला काही फारशा राजकीय ज्ञानाची आवश्यकता नाही. भेकडांना विचारतो कोण?

## वटहुकुमशाहीचा डाव

अशा काही भेकडांना, बेभरवशी व कणा नसलेल्या लाचारांना हाताशी धरून राष्ट्रपती आपले सत्तेचे मनसुबे पार पाडण्याची तयारी करीत आहेत, हाही धोका वेळीच ओळखला पाहिजे. इंदिरा गांधींची एकाधिकारशाही त्याज्यच आहे; पण प्रश्न असा आहे, की या एकाधिकारशाहीपेक्षाही त्याज्य असणारी राष्ट्रपतींची एकाधिकारशाही आपण आणणार आहोत का? चरण–चव्हाण–कंपू या दृष्टीने आज देशभर बांधाबांध करीत आहे. अगदी कर्नाटकात लोकप्रिय असलेले अरस जरी काँग्रेसअध्यक्ष झालेले असले तरी या अरस–चव्हाण–स्वर्णसिंग काँग्रेसला सध्या लोकसभेत आहेत त्यापेक्षा काही अधिक जागा मिळतील अशी चिन्हे आज तरी दिसत नाहीत. उत्तरेत चरणसिंग, दक्षिणेतील कर्नाटकात अरस आणि महाराष्ट्रात चव्हाण–पवार यांची उरलीसुरली ताकद यावर या काँग्रेसचा मुख्य भरोसा आहे. राष्ट्रपतींनी या गोटांशी आपली सोयरीक जमवून ठेवलेली आहे. कारण उरलेले दोन गट (१) इंदिरा काँग्रेस (२) जनता पक्ष कुठल्याही परिस्थितीत राष्ट्रपतींचे मनसुबे हाणून पाडल्याशिवाय राहणार नाही. कारण या दोन्ही गटांना राष्ट्रपतींनी टांग मारलेली आहे. एकूण निवडणुकीनंतरचे चित्र सध्या आहे त्यापेक्षा फारसे बदलले नाही तर राष्ट्रपती आणि हा चरण-चव्हाण-गट सध्या आहे त्याच स्वरूपाची काही व्यवस्था कायम ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करतील हे उघड आहे. मग या व्यवस्थेला राष्ट्रपती राजवट म्हणायचे, की काळजीवाहू सरकारची वटहुकुमशाही म्हणायचे हा शब्दांचा घोळ फक्त बाकी राहील. मुख्य मुद्दा सत्तेचे केंद्र राष्ट्रपतिभवन किंवा रेड्डी ही व्यक्ती झालेली असेल. आज तरी काय अवस्था आहे? चरण–चव्हाण हे राष्ट्रपतींनी नियुक्त केलेले नोकर म्हणूनच काम पहात आहेत. कुठलेही मोठे निर्णय ही नोकरमंडळी घेऊ शकत नाहीत. दुर्दैवाने मोठे निर्णय घ्यायची या २-३ महिन्यांत अचानक वेळ उद्भवलीच तर ते निर्णय राष्ट्रपती घेणार आहेत, चरण–चव्हाण नाही! लोकसभेत जर निवडणुकीनंतर अस्थिरता राहिली तर राष्ट्रपतींची व त्यांनी हाताशी धरलेल्या या चरण-चव्हाण गटाची सत्ता वाढणार आहे व जो जो देशाची स्थिती खालावत जाईल तो तो ती काबूत आणण्यासाठी हा राष्ट्रपती गट अधिकाधिक सत्तेची मागणी करीत राहणार आहे. हे पुढचे चित्र मतदारांनी आत्ताच ध्यानात घेऊन लोकसभेच्या आगामी निवडणुकीत आपली मते कोणाला द्यायची यासंबंधीचा निर्णय घेतला पाहिजे. राष्ट्रपती राजवटीची आपल्या घटनेत सोय नाही या भाबड्या समजुतीवर विसंबून या चोरपावलाने येणाऱ्या नव्या वटहुकुमशाहीच्या धोक्याकडे दुर्लक्ष करणे सर्वांना महागात पडणार आहे. इंदिरा गांधींनी वेळ आली तेव्हा घटना दुरुस्त्यांचा सपाटा सुरू केलाच होता ना? वरचेवर घटना दुरुस्तीच्या नावाखाली घटनेची मोडतोड करू नये एवढा व्यापक विचार, घटनेविषयीचा एवढा पवित्रताभाव अद्याप या देशात निर्माण झालेला नाही. अजून बाजारात तुरी आहेत तोवरच काँग्रेसअध्यक्ष देवराज अरस यांनी घटनेत बदल केला पाहिजे म्हणून भटणीला मारायला सुरुवातही केलेली आहे. तेव्हा इंदिरा गांधींच्या एकाधिकारशाहीचा पर्याय नाकारताना चोरपावलांनी ही राष्ट्रपती व चरण-चव्हाण यांची युती लोकशाही आचारविचारांचा पुन्हा एकदा गळा घोटणार नाही इकडेही लक्ष पुरवायला हवे. ज्या दिवशी मोरारजींनी राजीनामा दिला त्या दिवसापासून राष्ट्रपतींची ही वाटचाल सुरू झालेली आहे. अवघ्या ६०-७० लोकांचे पाठबळ असलेल्या चव्हाणांना मंत्रिमंडळ बनवण्यासाठी पाचारण करणे हा या वाटचालीचा पहिला टप्पा होता. शेवटचा टप्पा होता लोकसभेतील बहुसंख्य खासदार ज्यांच्यामागे होते त्या जगजीवनरामांना टांग मारून चरणसिंगांना बोलावण्याचा. अशीच अस्थिर लोकसभा निवडणुकांनंतर अस्तित्वात आली तर पुढचे टप्पे राष्ट्रपती लवकर लवकर गाठतील. कारण देशातील आर्थिक-सामाजिक स्थिती झपाट्याने घसरगुंडीला लागलेली असेल. अधिकाधिक सत्ता लोकांकडे मागितली जाईल व आणीबाणीसदृश एका नव्या पर्वाचा प्रारंभ होईल. नाव काहीही ठरो, मामला तोच. पात्रे एखादे वेळेस सोयीप्रमाणे इकडची तिकडे होतील. नाटक तेच. मार्क्सने फ्रान्समधील दुसऱ्या नेपोलियनच्या कारकीर्दीसंबंधी एक पुस्तक लिहिले आहे. या पुस्त-

काची सुरुवात अशी आहे : " Hegel remarks somewhere that all facts and personages of great importance in world history occur, as it were, twice. He forgot to add the first time as trajedy, the second as farce. " हेगलने कुठे तरी असे म्हटलेले आहे– " इतिहासातील मोठ्या घटना व व्यक्ती दोनदा उद्भवतात;" पण याला ही एक पुस्ती जोडायला हेगेल विसरला. पहिल्या वेळी ही एक शोकांतिका असते. दुसरी वेळ म्हणजे केवळ विडंबन ! राष्ट्रपती आणि त्यांचे आजचे चरण-चव्हाण हे साथीदार जी एकाधिकारशाही आणू पाहात आहेत ती अशीच पहिल्या इंदिराशाहीचे केवळ विडंबन असेल ! कारण त्यात पहिलीचा जोष असणार नाही. एकाधिकारशाही कुठलीही वाईटच. कुठलाही स्वातंत्र्यप्रेमी माणूस ती स्वीकारणार नाही; पण पहिलीत स्वातंत्र्याच्या मोबदल्यात भाकरी देण्याचे निदान आश्वासन तरी होते. दुसरीत दोन्हींचाही पत्ता नसेल. कारण जनमानसात स्थान नसणाऱ्या काही हतोत्साह व गलितगात्र व्यक्तींनी हाती आलेली थोडीफार सत्ता निसटून जाऊ नये म्हणून केलेली ती अखेरची, केविलवाणी धडपड असेल. अटलबिहारी बाजपेयी यांनी नुकतीच व्यक्त केलेली भीती या संदर्भात ध्यानात घेण्यासारखी आहे. आगामी निवडणुकीत कुणालाच निर्णायक बहुमत मिळाले नाही आणि पक्षांचे बलाबल गेल्या बरखास्त लोकसभेप्रमाणेच राहिले, तरी राष्ट्रपती जगजीवनरामांना पुन्हा मंत्रिमंडळ बनविण्यासाठी, त्यांच्यामागे सर्वाधिक ताकद असली तरीदेखील बोलावणार नाहीत, असे अटलजींनी भाकित वर्तवले आहे. याचा अर्थ काय होतो ? याचा स्वच्छ अर्थ असा होतो की, आज आहे तेच कडबोळे हाताशी धरून राष्ट्रपती वटहुकुमांच्या आधारे राज्यकारभार चालू ठेवणार. कारण पुन्हा निवडणुका तर ते जाहीर करूच शकत नाहीत. अडीच-तीन वर्षांनी निवडणुका आल्या म्हणून आ ाच लोक वैतागलेले आहेत. एकीकडे देश गरीब म्हणायचे आणि राजकारण्यांच्या नालायकीमुळे दोन-दोनशे, तीनतीनशे कोटींच्या निवडणुकांच्या खर्चात पुन्हापुन्हा देशाला लोटायचे हा केवळ दिवाळखोरीचा धंदा ठरेल. आज लोक इंदिरा गांधींकडे वळत आहेत याचे एक प्रमुख कारण म्हणजे लोकशाही राजकारण करू पाहणाऱ्यांचा नालायकपणा. पुन्हा निवडणुका आल्या तर लोक इंदिरा गांधींच्या बाजूने पूर्णपणेच वळलेले दिसतील. कारण नालायकपणाचा तेव्हा कळसच झालेला असेल. तेव्हा राष्ट्रपती पुन्हा निवडणुका घेण्याचा वेडेपणा करणार नाहीत–आहे तसाच लोकसभेतील एखाददुसऱ्या अल्पसंख्य गटाचा आधार घेतघेत ते आपली पकड मजबूत करण्याचा प्रयत्न चालू ठेवतील. तेव्हा चरण-चव्हाण-राष्ट्रपती यांची चोरदरवाजाने हळूहळू येणारी दुर्बल एकाधिकारशाही व इंदिरा गांधींची सांगूनसवरून, उघड पद्धतीने, लोकांच्या पाठिंब्यावर येणारी एकाधिकारशाही असे दोन हुकुमशाही पर्याय मतदारांसमोर आहेत. तिसरा चुकतमाकत, ठेचकळत पुढे जाणारा जनता पक्षाचा लोकशाही पर्याय उपलब्ध आहे; पण ?...

## इटली–फ्रान्सचे चुकीचे दाखले

जनता पक्ष म्हणजे जनसंघ, जनसंघ म्हणजे संघ आणि संघ म्हणजे जुनाटपणा–चातुर्वण्य वगैरे, हे यशवंतरावांनी महाराष्ट्रात रूढ केलेले व मधू लिमये, राजनारायण वगैरेंनी भारतभर आणि परदेशातही पसरवलेले दुष्ट समीकरण प्रथम डोक्यातून काढून टाकावे लागेल. जनता पक्ष फोडण्यासाठी हा सापळा यशवंतरावांनी लावून ठेवला आणि त्यात ही मंडळी अलगद प्रविष्ट झाली. उंदीरसुद्धा सापळ्यात काही आमिष दिसले तरच शिरतो. तेवढीही दूरदृष्टी या मंडळींनी दाखवली नाही. जॉर्ज–मधू वगैरे मंडळींची विश्वासार्हताच संपली. जनता पक्ष फुटायचा तो फुटलाच. संघ वाढायचा तो वाढतोच आहे. मग ही फोडाफोड करून या मंडळींनी साधले काय असा प्रश्न आहे. एक दुर्बळ, कसलीही सत्ता नसलेले नाकर्ते सरकार दिल्लीत आणून ठेवले; दोन–तीनशे कोटींच्या वायफळ निवडणूकखर्चात या गरीब देशाला ढकलण्यात कसला आला आहे समाजवाद आणि ही कुठली धर्मनिरपेक्षता ? आता आपल्या राजकीय दिवाळखोरीवर पांघरूण घालण्यासाठी ही मंडळी इटली, फ्रान्स वगैरे देशांची उदाहरणे पुढे करू लागली आहेत. भारतीय जनतेने यापुढे आता स्थिर शासनाची अपेक्षाच ठेवू नये, इटली–फ्रान्समध्ये आघाडीची सरकारे येतात–जातात तसे आपल्याकडे आले म्हणून बिघडले कोठे ? असा या मंडळींचा नवा, फसवा युक्तिवाद आहे. इटली हा देश केवढा ? युरोपातही त्याला कुणी विचारत नाही आणि फ्रान्समध्ये समाजवादाचे काय खोबरे झाले हे काय या मंडळींना माहीत नाही का.? द गॉलने दहा वर्षे सगळ्यांनाच झोपवले. जिथे पॅरिस कम्युन जन्माला आले, जेथे स्वातंत्र्य–समता–बंधुता या तत्त्वांचा उद्घोष झाला तेथे अजूनही शास्त्रीय समाजवादी व्यवस्थेचा मागमूस नाही, अशी खरी स्थिती आहे. तेथे समृद्धी आहे, समता आहे पण निधर्मी समाजसत्तावादी देश म्हणून फ्रान्सकडे कुणी पाहत नाही हेही ध्यानात घेणे अवश्य आहे. इग्लंडच्या फेबियन समाजवादाइतकीही किंमत फ्रेंच समाजवादाला कुणी देत नाही. याचे एक कारण तिकडील मधू लिमयांसारखे पुढारी हेही असल्याचे जाणकार अभ्यासक सांगत असतात. इतरही कारणे आहेतच. मुख्य कारण – ' France was typically a country of the peasant, the artisan, the clerk and the small rentier...they were economically conservative. ' फ्रान्समध्ये धर्माचा पगडा आहे, लहान शेतकरी–कारागीर–कारकून या मध्यमवर्गीयांचे फ्रान्सच्या समाजव्यवस्थेत प्राबल्य आहे, वगैरे कारणे फ्रान्समध्ये समाजवाद न येण्याला आहेतच; पण फ्रेंच समाजवादी नेतृत्वाचा राजकीय थिल्लरपणा हेही एक कारण

फ्रान्समधील समाजवादी विचारांच्या पराभवामागे आहे असे अभ्यासक सांगतात. युरोपीय समाजवादी पक्षांच्या यशापयशाचा आढावा घेत असताना शुंपिटर या प्रख्यात अर्थ व राज्यशास्त्रज्ञाने फ्रान्स-बद्दल ही मीमांसा केलेली आहे. फ्रान्सभर निष्ठापूर्वक समाजवादी पक्षाची बांधणी करण्याऐवजी फ्रेंच समाजवादी नेते पॅरिसमध्ये बसून मंत्रिमंडळे पाडण्यात आणि कुणाच्याही मंत्रिमंडळात घुसून सत्तास्थाने मिळवण्यात मश्गुल राहिल्याने जर्मनी–इंग्लंडसारखी एखादी बांधेसूद व जागतिक समाजवादी चळवळीत काही मौलिक भर टाकू शकणारी समाजवादी चळवळ फ्रान्समध्ये उभीच राहू शकली नाही, सिंडिकॅलिझमसारखे फुटकळ प्रकार तेथे उदयास आले असे शुंपिटरने म्हटले आहे. खरोखरच मधू लिमये–जॉर्ज वगैरे लोहियावादी मंडळींना आपल्याकडे निधर्मी–समाजवादी व्यवस्था आणायची असेल तर त्यांनी फ्रान्स–इटली या देशांकडे धोक्याचे कंदील म्हणून पाहायला हवे. त्याऐवजी आपल्या मंत्रचळेपणावर पांघरूण घालण्यासाठी ते या दाखल्यांचा उपयोग करीत आहेत. आपल्याकडे हा राजकीय थिल्लरपणा परवडणारा नाही; बळकट व स्थिर केंद्र शासन ही आपली प्रधान गरज आहे. आपल्या घटनाकारांनीही केंद्र दुबळे होणार नाही हेच उद्दिष्ट घटनानिर्मिती करताना मुख्यत: डोळ्यांसमोर ठेवलेले होते. भारत एकात्म आणि अखंड राहिला तर समाजवाद येथे पुढेमागे अवतीर्ण होण्याची शक्यता आहे. यासाठी येथे स्थिर केंद्रशासन हवे. ती आपल्या विकासाची, राष्ट्रीय पुनर्रचनेची प्रधान गरज आहे. ही आपली मूलभूत गरज न ओळखता उगाच फ्रान्स–इटलीचे फालतू दाखले देऊन धूळफेक करण्यात काय अर्थ आहे ?

## दुर्बल केंद्रसत्ता आणि कम्युनिस्ट

तेव्हा बळकट आणि स्थिर सरकार स्थापन करता येईल अशी भरघोस संधी जनता पक्षाला पुन्हा देणे हा सद्य:स्थिती पाहता सर्वश्रेष्ठ लोकशाही पर्याय ठरावा. वेळ संपण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या हातातून उत्तरपत्रिका काढून घ्याव्यात तसा काहीसा प्रकार जनता पक्षाच्या बाबतीत दुर्दैवाने झालेला आहे. जनता पक्षाने २८महिन्यांच्या कारकीर्दीत काय ठोस कामगिरी केली त्याचे मुद्देसूद व प्रभावी निवेदन जॉर्ज फर्नांडिस यांनीच राजीनामा देण्यापूर्वी लोकसभेत केलेले असल्याने तो सर्व पाढा येथे वाचण्याचे कारण नाही. देशाचे चित्र बदलावे अशी आकांक्षा बाळगणारी बहुसंख्य मंडळी जनता पक्षात एकत्रित झालेली होती–आहेत ही वस्तुस्थिती राजकीय विरोधक सोडून सर्वसामान्य लोक अद्यापही मान्य करीतच आहेत. या मंडळींना पुन्हा एकदा आपली योग्यता सिद्ध करण्याची संधी मिळायला हवी, दगलबाजी व विश्वासघात यामुळे त्यांची संधी अर्ध्यावरच हिसकावून घेतली गेलेली आहे. हीच मंडळी लोकशाहीला वचनबद्ध आहेत व त्यांची सत्तेवर असतानाची २८ महिन्यांतील कृती याबाबतीत तरी संशयातीत आहे; पण अशी संधी या मंडळींना पुन्हा मिळू नये, ही मंडळी राज्य चालवायच्यासुद्धा पात्रतेची नाहीत, देशाचे भवितव्य यांच्या हाती सुरक्षित राहणार नाही अशी ज्यांची समजूत असेल त्यांनी मग अधलामधला पर्याय न स्वीकारता सरळ इंदिरा गांधींच्या गोटात सामील होणे चांगले. चरण–चव्हाण आणि राष्ट्रपती यांनी रचलेल्या षड्यंत्राचा त्यांनी वेळीच अंदाज घ्यावा व हे मागील दाराने एकतंत्री राजवट देशावर लादण्याचे कारस्थान हाणून पाडावे. या अर्धवट व दुबळ्या एकतंत्री राजवटीने आपले कुठलेही प्रश्न सुटणार नाहीत. इंदिरा गांधी जरी आल्या तरी प्रश्न सुटतील की नाही ही वानवाच आहे; पण त्या निदान स्थिर व बळकट केंद्रसत्तेचा आधार तरी जनमानसाला देऊ शकतात. राष्ट्रपती व चरण–चव्हाण ना असा आधार देऊ शकतात, ना त्यांच्याजवळ कसली उपक्रमशीलता. सगळी वठलेली झाडे. अठरापगड गटांचे हे कडबोळे. या कडबोळ्याला डाव्या पक्षांनी आधार दिलेला आहे तो उगाच नाही. कारण दिल्लीत स्थिर व मजबूत सरकार येणे इथल्या डाव्या गटांना नकोच आहे. त्यांच्या सत्ताप्राप्तीचे मनसुबे यामुळे आजवर धुळीला मिळत आलेले आहेत. दिल्ली अस्थिर राहिली तरच कम्युनिस्टांना आज नाही तर उद्या तिच्यावर झडप घालण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे. इंदिरा गांधी आल्या तर देशात पुन्हा निवडणुका होणार नाहीत असे चव्हाणांनी बंगलोरच्या एकत्रित कॉंग्रेस मेळाव्यात केलेल्या भाषणात सांगितले. खरे आहे हे; पण चव्हाण–चरण आले तरी निवडणुकांची शाश्वती उरली आहे का? एकतंत्री राजवटीचेच हे दोन पर्याय आहेत. फरक इतकाच की, एक मागील दाराने, छुप्या पद्धतीने लादली जाणार आहे. एक पुढच्या दाराने मिरवत येणार आहे. लोकशाही आणि विकास, भाकरी आणि स्वातंत्र्य दोन्ही सुरक्षित ठेवणारे हे दोन्ही पर्याय नाहीत. यासाठी जनता पक्षाकडेच सद्य:स्थितीत वळावे लागते. तो अपूर्ण आणि गोंधळाचा असला तरी. हुकुमशाहीतही गोंधळ असतोच. फक्त तो कालांतराने उजेडात येतो इतकेच. □

माणूस : दिवाळी अंक : तपशील लवकरच....

## सप्रेम नमस्कार....

पृष्ठ १ वरून

---

□ आपल्या १ सप्टेंबर १९७९ च्या अंकातील ' धिक्कार दिन–मुंबई 'चा आपल्या प्रतिनिधीचा अहवाल वाचून करमणूक झाली व काही वेळा रागही आला. बऱ्याच गोष्टी कपोलकल्पित वाटल्या.

१ : मृणाल गोरेंच्या मोर्चाला कोणी माणसे नव्हती. कुणास ठाऊक. परंतु १२ ऑगस्टच्या मृणालताईंच्या घरावर गेलेल्या जनता पक्षाच्या रा. स्व. संघ संचालित मोर्चाचे काय वांगे वाजले ते सर्वांना ज्ञात आहे. तेव्हा ही बातमी खोटी वाटते.

२ : शिवाजी पार्कच्या सभेस मी स्वतः होतो. प्रतिनिधीने मुसलमानांचा सुरुवातीस अकारण उल्लेख केलेला आहे, ते मुसलमान औषधालाही कुठे सभेला दिसल्याचे आठवत नाही; तसेच सभा मोठी झाली असली तरी कामगारवर्ग वगैरे सर्व थरातील लोक नव्हते, तर सर्व मध्यमवर्गीय जवळजवळ होते. कदाचित नागपूरहून आदेश वगैरे आला असल्यास सभा मोठी केली असेल. सभा मात्र निःसंशय मोठी होती.

३ : जनकल्याण समितीतर्फेच (रा.स्व.संघ) फक्त निधी गोळा केला जात नव्हता, तर सेवा दल वगैरेचे लोकही ते काम करीत होते. तसेच लोकसत्ता, तरुण भारत, म. टाइम्स वगैरेंना माहीत नसेल कदाचित् किंवा मुद्दामहून या संघीय पत्रांनी मोठ्या टाइपात वगैरे छापले नसले, तरी सेवा दलाचे वगैरे लोक केव्हाच तेथे मोरवीला पोहोचलेले आहेत. संघाची मात्र तीच पत्रे सर्व वृत्तपत्रांत छापून येत आहेत.

४ : शेंगदाण्याचे स्टॉल वगैरे प्रतिनिधीला खटकले म्हणजे प्रतिनिधी बहुतेक आयुष्यात पहिल्यांदाच शिवाजी पार्कवर गेला असावा. तेथे कित्येक वर्षे असे स्टॉल आहेत.

५ : डॉ. सुब्रह्मण्यम् स्वामी हे अजूनही जनतेत लोकप्रिय आहेत हा नवीनच एक शोध आहे. वस्तुतः Staunch संघवालेसुद्धा या Subramaniam ( सब–रम्–आणि–यम ) स्वामीचे नाव काढले की, मूग गिळून बसतात, इतकी आचरट याची वागणूक आहे. त्याच्या बोलण्यावागण्यावरून अशी खात्री होते की, एकतर HARVARD ला वाटेल त्या फालतू लोकांना Degree मिळते किंवा तो हार्वर्ड ऐवजी हरद्वारला शिकला असेल व HARVARD ला शिकलो म्हणून थाप ठोकत असेल. असल्या माणसाची सुभाषबाबूंशी तुलना करणे यापरता त्यांचा दुसरा अपमान होऊ शकत नाही. सुभाषबाबूंचे बूट पुसायचीसुद्धा याची लायकी नाही. त्याला आधी बोलण्याचा आग्रह केला म्हणजे तमाशाआधी गण-गवळण असते तसा प्रकार झाला. तसेच आदेश असल्यामुळे, अटलबिहारींच्या भाषणानंतर, मोरारजींच्या भाषणाच्या वेळी किती लोक उठून गेले हे लिहिण्याचे तो सोयिस्करपणे विसरला. मोरारजींसाठी गर्दी ही जनता पार्टी परत सत्तेवर आल्यास परत मोरारजींना पंतप्रधान बनवण्याच्या कारस्थानातील एक खेळी दिसते. जनसंघाला दलित पंतप्रधानांचा एवढा कळवळा होता, तर ७७ साली किंवा even ७९ साली मोरारजींना पाठिंबा देण्याचा उद्योग कशाला केला? आताही परत; जगजीवनरामना डावलण्यासाठी तीच चाल चालू आहे. हे पत्र फेरफार न करता छापाल अशी आशा आहे.

२ सप्टेंबर —माधव रानडे,
मुंबई

□ श्री. माधव रानडे यांचं पत्र वाचलं. ' धिक्कार-दिन ' चा अहवाल मीच लिहिला होता. तो वाचून रानडेसाहेबांची करमणूकही झाली आणि काही वेळा त्यांना रागही आला. एकाच वेळी दोन इतक्या टोकाच्या भावना उद्दीपित करण्याचं सामर्थ्य माझ्या लेखणीत असल्याचं मलाही हे पत्र वाचल्यावरच कळलं. आणखीही एक गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे श्री. रानडे मृणाल-जॉर्ज-लिमये गटाचे चाहते असल्यामुळे मृणालताईंच्या फसलेल्या मोर्चाचा मी जाता जाता केलेला उल्लेखही त्यांना उगीचच फार खट-

---


### नवीन दाखल झालेली पुस्तके

| | |
|---|---|
| १ ) पातंजल योगविद्या–स्वानंदसरस्वती | रु. १५।– |
| २ ) तिबेटी योगविद्या–स्वानंदसरस्वती | रु. १५।– |
| ३ ) गायत्रीमंत्र–साधना आणि सामर्थ्य– ल. म. जोशी | रु. १२।– |
| ४ ) मी मंत्री झालो–( आत्मचरित्रात्मक लेख )–रमेश मंत्री | रु. २२।– |
| ५ ) उन्मनी–( कथासंग्रह )–सौ. शैलजा राजे | रु. २३।– |
| ६ ) अविवाहिता–( कादंबरी )–राजा राजवाडे | रु. १८।– |
| ७ ) सात व्यथा दोन हत्या–( कादंबरी )–दिनानाथ ना. लाटे | रु. २२।– |
| ८ ) भुलावण–( कादंबरी )–शैलजा राजे | रु. १५।– |

**ENGLISH**

1 ) The Tangent Factor–Lawrence Sanders
2 ) Little Women–( Classic )–Louisa M. Alcott
3) The Bitch–Jackie Collins 15/65
4 ) Operation Mind Control– ( The C. I. A. 'S plot against America )– Walter Bowart

Watching TV will make you a conformist ! But book reading will make you an individualist ! !

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०**

कला आणि मग त्यांनी आपला बहुमोल वेळ आणि शाई खर्चून एकेका फटकाऱ्याने एकेका वर्तमानपत्राला आणि राजकीय नेत्यांना मारण्यास आरंभ केला.

१. आता मृणालताईंच्या मोर्चाला माणसं पुरेशी होती की नव्हती हे रानड्यांनाही माहीत नाहीच, पण ज्या अर्थी त्यांच्या घरावर गेलेल्या रा. स्व. संघ संचालित मोर्चाचं वांगं वाजलं ( मला कळलेला नवा वाक्प्रचार) त्या अर्थी मृणालताईंच्या मोर्चाला पुरेशी माणसं नव्हती ही मी दिलेली बातमी खोटी आहे, असा निष्कर्ष रानड्यांनी काढून ठेवला आहे. म्हणजे ज्या अर्थी करकोच्याने दिलेल्या भांड्यातून कोल्ह्याला आमरस खाता आला नाही त्या अर्थी वाघाने हरण मारलं ही बातमी खोटी असली पाहिजे, अशी काही तरी श्री. रानडे यांच्या तर्कशास्त्राची घाटणी आहे.

२. रानडेसाहेबांचं नुसतं तर्कशास्त्रच अजब आहे असं नाही, तर त्यांची वाचन पद्धतीही विचित्र आहे. माझ्या लेखात मी मुसलमानांचा जो उल्लेख केला आहे तो शिवाजी पार्कवर सभेसाठी जमलेल्या मुसलमानांचा नसून व्ही. टी. ते शिवाजी पार्क हा प्रवास बसमधून करत असताना रस्त्यावर दिसलेल्या मुसलमानांसंबंधीचा आहे. पण संदर्भ नीट लक्षात न घेता रानडेसाहेब एकदम मुसलमान हा शब्द वाचून बिघडले आणि त्यांनी त्यावर एक स्वतंत्र मुद्दा लिहिला. अर्थात सभेमध्ये मुसलमान होते की नाही हे सांगणं माझ्या सारख्या सामान्य कुवतीच्या माणसाला अशक्यच होतं. कारण ' निःसंशय मोठ्या सभेत ' कोण, कुठल्या जाती-धर्माचा आहे हे निश्चितपणे ओळखण्यासाठी जो विश्लेषणात्मक अभ्यास लागतो तो माझ्याजवळ नाही. रानडेसाहेब जरी माझ्या समोर उभे राहिले असते तरी ते पारशी किंवा गुजराथी नाहीतच, हे मी छातीठोकपणे सांगू शकलो नसतो.

३ : मोरवी पूरग्रस्तांसाठी जनकल्याण समितीव्यतिरिक्त इतर कोणीच निधी उभारत नव्हतं असं मी कसं म्हणू शकेन ? माझी खात्री आहे की स्वतः रानडेसाहेबांनी या निधीसाठी हजार दोन हजार रुपये काढून दिले असतील. मी फक्त शिवाजी पार्कवर जे लोक निधी गोळा करताना दिसले त्यांची नावं दिली. कारण शिवाजी पार्कच्या सभेबद्दल मी लिहीत होतो. पूरग्रस्त निधीबद्दल नव्हे. सेवा दलाचे लोक मोरवीला पोचले आहेत, हे मी मोरवीला गेलो नसल्यामुळे आणि शिवाजी पार्कवर रानडेसाहेबही न भेटल्यामुळे मला कसं समजणार ? त्यातून समाजवाद्यांची प्रसिद्धीपराङमुखताही त्यांच्यावर झालेल्या या अन्यायाला कारणीभूत आहे. कधीही, कितीही वादग्रस्त मुद्दा निघाला तरी आपण बरं की आपलं काम बरं, अशी वृत्ती असणाऱ्या या समाजवाद्यांचा कैवार घेण्यासाठी रानडेसाहेब पुढे आले ही गोष्ट निश्चितच कौतुकास्पद आहे.

४ : शिवाजी पार्कवरील शेंगदाण्याचे स्टॉल्स मला खटकले त्या अर्थी मी आयुष्यात पहिल्यांदाच तिथे गेलो असलो पाहिजे. हा रानडेसाहेबांचा आणखी एक तर्काधिष्ठित मुद्दा. वस्तुस्थिती अशी आहे की, शिवाजी पार्कवर मी अनेक वेळा गेलो आहे. तिथल्या स्टॉल्सवरचे शेंगदाणेही स्वतःच्या पैशाने खाल्ले आहेत; पण तरी देखील ' धिक्कार दिना 'च्या सभेच्या वेळी हे स्टॉल्स तिथे असणं मला अप्रस्तुत वाटले. सभेच्या गांभीर्याला जत्रेचं गालबोट लावणारे वाटले. ही माझी वैयक्तिक प्रतिक्रिया होती. रानडेसाहेबांनी ती एवढ्या गंभीरपणे विचारात घेऊन पुन्हा एकदा आपल्या विचित्र तर्कशास्त्राचं दर्शन घडवण्याची काहीच आवश्यकता नव्हती.

५ : डॉ. सुब्रह्मण्यम स्वामी यांच्याबद्दल रानडेसाहेबांनी कोटीप्रचुर असे इतके काही लिहिले आहे की, त्यावर आणखी काही लिहून स्वतःची पातळी सोडण्याची माझी इच्छा नाही.

६ : रानडेसाहेबांचं हे पत्र आपण फेरफार न करता छापाल की नाही याची त्यांना धास्ती वाटत आहे; पण मला तशी वाटत नाही. कारण याहूनही किती तरी सामान्य आणि विक्षिप्त विचार वाचकांना मांडू देण्याचे धैर्य ' माणूस 'ने वेळोवेळी दाखवलं आहे.

७ : शेवटी हे सबंध पत्र वाचून एकच गोष्ट प्रकर्षाने जाणवली. ती म्हणजे, संवाविषयी जॉर्ज मृणाल पातळीच्या समाजवाद्यांना वाटणारी मळमळ या पत्रातून चांगली व्यक्त झाली आहे. ती संघवाल्यांनाही मार्गदर्शक आहे.

—सतीश कामत


# टॉलस्टॉय — एक माणूस

## लेखिका : सौ. सुमति देवस्थळे

आवृत्ती दुसरी । मूल्य पंचावन्न रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०.